# प्रकरण पाचवे

## माहितीचा अधिकार, ग्रामसभा आणि इतर कायदे पारित करण्यासाठी अण्णांचे योगदान

**५.१ प्रस्तावना**

**५.२ माहितीचा अधिकार, ग्रामसभा व इतर कायद्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा तपशील**

५.२.१ आघाडी सरकार : मा. विलासराव देशमुख व मा. सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री असतांना अण्णा हजारे यांनी केलेले प्रयत्न.

५.२.२ माहिती अधिकार, ग्रामसभेला जादा अधिकार, दप्तर दिरंगाई, बदल्यांचा कायदा यासाठी अण्णा हजारे यांनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा.

**५.३ माहितीचा अधिकार : जनस्वातंत्र्याची दुसरी लढाई**

**५.४ माहितीच्या अधिकाराचा हक्क म्हणजे काय ?**

**५.५ माहितीचा अधिकार कायद्याचा इतिहास**

**५.६ माहितीचा अधिकार कायद्याचा भारतातील इतिहास**

**५.७ माहितीचा अधिकार, त्याचे स्वरुप व प्रक्रिया**

**५.८ माहितीचा अधिकार कायद्याचे अधिकार क्षेत्र**

**५.९ माहिती मिळण्याबाबतची पध्दत**

५.९.१ माहितीचे शुल्क

५.९.२ माहिती उघड करण्यातून सूट

**५.१० केंद्रिय माहिती आयोग**

५.१०.१ पात्रता

५.१०.२ कार्यकाळ

५.१०.३ पदच्युती

**५.११ राज्य माहिती आयोग**

५.११.१ पात्रता

५.११.२ पदच्युती

५.११.३ माहिती आयोगाचे अधिकार व कार्ये

५.११.४ अपील

५.११.५ दंडनीय तरतूद

५.११.६ समारोप

**५.१२ ग्रामसभा**

**५.१३ ग्रामसभा आणि ग्रामसभेच्या कायद्याची कार्यपध्दती याविषयी अण्णा हजारे यांच्या अपेक्षा.**

५.१३.१ ग्रामसभा

५.१३.२ ग्रामसभेच्या कायद्याची कार्यपध्दती

**५.१४ मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता**

**अधिनियम.**

५.१४.१ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३

५.१४.२ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३

५.१४.३ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८

**५.१५ शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसंबंधी आणि शासकीय कर्मचाऱ्याच्या कामात दप्तर दिरंगाईसंबंधी अण्णांचे विचार आणि केलेले कायदे.**

**५.१६ दप्तर दिरंगाइचा कायदा २००६.**

**५.१७ सारांश**

## ५.१ प्रस्तावना :

अण्णांनी त्यांच्या आयुष्यात सुरुवातीला महात्मा गांधींच्या बलशाली भारताच्या संकल्पनेप्रमाणे खेड्यांचा विकास, स्वावलंबी गाव, स्वयंपूर्ण गांव, स्वयंशासित गाव हे सूत्र हाती घेऊन राळेगणसिध्दीसारख्या २५०० लोकवस्तीच्या स्वतःच्या गावापासून समाजकार्याला सुरुवात केली.

विकासाच्या सर्वांगांना स्पर्श करुन ग्रामस्थांच्या एकजुटीने राळेगणसिध्दी हे गाव पथदर्शक गाव म्हणून उभे केले. त्या गावाचा गुणाकार व्हावा, म्हणून महाराष्ट्रातील दहा जिल्ह्यांमध्ये ८५ खेड्यांमध्ये युवकांच्या सहकार्याने ग्रामविकासाचे कार्य सुरु केले. इतर राज्यांतही अशी गावे उभी व्हावीत म्हणून अनेक वर्षांपासून अण्णांचे प्रयत्न चालू आहेत.

विकासकामांमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन ती सत्ता मतदारांच्या हाती जात नाही, तोपर्यंत अपेक्षित लोकसहभाग मिळू शकणार नाही, त्याप्रमाणे विकासकामांमध्ये, आर्थिक व्यवहारामध्ये पारदर्शकता येणार नाही, तोपर्यंत नागरिकांचा विश्वास संपादन होणार नाही, असे अण्णा म्हणतात.

१९४७ मध्ये आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले; पण स्वातंत्र्य कुणाला मिळाले हा प्रश्न आहे. इंग्रजकाळात जी माणसे गुलामगिरीत जीवन जगत होती, त्यामध्ये विशेष फरक पडल्याचे जाणवत नाही. तोच भ्रष्टाचार, गुंडगिरी, दडपशाही, हुकूमशाही आजही चालूच आहे. फक्त गोरे गेले आणि काळे आले, यापेक्षा वेगळे काय? असे अण्णा हजारे म्हणतात. इंग्रजांनी भारतावर राज्य करताना फोडा व झोडा ही नीती वापरली होती. त्या नीतीच्या आधाराने १५० वर्षे राज्य केले.

आजही तीच नीती खेड्यापाड्यामध्ये दिसून येते. गटतट नसणारे गाव आज शोधूनही सापडणार नाही. ७३ व्या घटना दुरुस्तीप्रमाणे सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन खेड्यांच्या विकासाला गती मिळावी, विकासकामांना गती मिळून भ्रष्टाचाराला आळा बसावा, विकास कामांचा दर्जा सुधारावा यासाठी अनेक वर्षांपासून अण्णा हजारे प्रयत्न करत आहेत. त्यासाठी माहितीचा अधिकार, ग्रामसभेला जादा अधिकार मिळावेत, बदल्यांचा कायदा व्हावा, दप्तर दिरंगाई दूर व्हावी यासाठी अण्णा प्रयत्न करत होते.

**<u>ग्रामसभा :</u>**

गावात विकासकामांसाठी आलेल्या निधीचा हिशेब ठेवण्यासाठी ते ग्रामपंचायतीच्या खात्यावर वर्ग करण्यात यावा; मात्र ग्रामपंचायतीने तो निधी खर्च करताना ग्रामसभेची मान्यता घेऊनच खर्च करायला हवा, ज्याप्रमाणे केंद्रामधील मंत्रिमंडळ लोकसभेची मान्यता घेते, त्याप्रमाणे ग्रामसभा ही गावाची संसद आहे व ग्रामपंचायत हे गावाचे मंत्रिमंडळ आहे, गावाच्या या मंत्रिमंडळाने गावाच्या ग्रामसभेची मान्यता घेऊनच आलेला निधी खर्च करायला हवा, एखाद्या ग्रामपंचायतीने ग्रामसभेची मान्यता न घेता आलेला निधी परस्पर खर्च केला, तर ग्रामसभा सरपंच - उपसरपंचाला बरखास्त करील व ग्रामसेवकावर शिस्तभंगाची कार्यवाही होईल.

**<u>ग्रामसभेच्या कायद्याची कार्यपध्दती :</u>**

एखाद्या ग्रामपंचायतीने विकासकामांचा निधी ग्रामसभेची मान्यता न घेता परस्पर खर्च केला, तर गावातील मतदारांच्या २०% मतदार आपल्या सह्यानिशी जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे चौकशी व्हावी यासाठी अर्ज करतील. मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांना त्या गावात चौकशीसाठी पाठवतील, चौकशीमध्ये ग्रामसभेची मान्यता न घेता ग्रामपंचायतीने आलेला निधी परस्पर खर्च केल्याचे स्पष्ट झाले; तर मुख्य कार्यकारी अधिकारी आपला अहवाल विभागीय आयुक्ताकडे सादर करतील. आयुक्तांची खात्री पटली, की ग्रामपंचायतीने निधी परस्पर खर्च केला आहे, तर आयुक्त, सरपंच - उपसरपंचाना बारखास्त करतील आणि ग्रामसेवकावर शिस्तभंगाची कार्यवाही होईल. ही कार्यवाही कार्यकारी अधिकारी यांनी एक महिन्याच्या आत करावयाची असून आयुक्तांनीही एक महिन्यात निर्णय घ्यायचा. यदाकदाचित एखाद्या सरपंच, उपसरपंचाला आपल्यावर अन्याय झाला असे वाटत असेल तर त्यांना सरकारकडे दाद मागता येईल. सरकारचा निर्णय अंतिम राहील. अशा प्रकारचा कायदा करुन, त्याची अंमलबजावणी व्हावी, असा अण्णांचा आग्रह होता.

**<u>दप्तर दिरंगाई :</u>**

बऱ्याचशा सरकारी कार्यालयांमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना, अधिकारी यांना काही चिरीमिरी दिल्याशिवाय काम करायचे नाही अशी सवय जडली होती. कामाच्या मोबदल्यात टेबलाखालून

लाच घ्यावयाची व नंतरच काम करायचे अशी प्रवृत्ती वाढली होती. ४/६ हेलपाटे मारणे गरीब माणसाला, ज्यांचे हातावर पोट आहे, मजुरी केल्याशिवाय चूल पेटत नाही अशा माणसांना शक्य नसते. त्यासाठी एका टेबलावरील पेपर दुसऱ्या टेबलावर सात दिवसांच्या आत गेला पाहिजे. सात दिवसांच्या आत पेपर पुढे न गेल्यास टेबलावर असलेल्या संबंधितावर शिस्तभंगाची कार्यवाही व्हावी, असा कायदा व्हावा, जेणेकरुन प्रत्येक नागरिकांला कार्यालयामध्ये जाण्याची वेळच येऊ नये. कार्यालयीन कामामध्ये जेवढा विलंब होतो. तेवढा भ्रष्टाचार वाढतो. सात दिवसांत कार्यवाही पूर्ण झाली, तर नागरिकांना कार्यालयामध्ये जाण्याची वेळच येणार नाही, असे अण्णा हजारे यांचे मत होते.

त्यामुळे दप्तरदिरंगाई संबंधात कायदा व्हावा याबाबतीत अण्णा हजारे यांनी सातत्याने प्रयत्न केले होते.

**<u>बदल्यासंबंधाने :</u>**

कोणत्याही अधिकाऱ्याची तीन वर्षांत बदली करु नये. तीन वर्षांनंतर त्यांना एका जागेवर ठेवू नये. काही कारणास्तव एखाद्या अधिकाऱ्याची बदली करणे आवश्यक असेल तर मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांनाच अधिकार असावेत, बदल्यांसंबंधात बऱ्याच लोकांचे हितसंबंध असतात. काही वेळेला आर्थिक गैरव्यवहार होतात, वेळेला आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यास आपल्या सोयीच्या जागी घेतल्याने प्रामाणिक काम करणाऱ्या माणसावर अन्याय होतो. कारण बऱ्याच लोकप्रतिनिधी

आणि अधिकाऱ्यांस त्याचा प्रामाणिकपणा आवडत नाही. त्यासाठी बदल्यांचा कायदा होणे आवश्यक आहे असे अण्णा हजारे यांचे मत होते.

**<u>वॉर्डसभा :</u>**

सत्तेचे विकेंद्रीकरण करुन मतदारांच्या हातात सत्ता आल्याशिवाय लोकशाही येऊच शकत नाही. ७३ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे ग्रामसभेला अधिकार देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ७४ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे वॉर्डसभेला अधिकार मिळणे आवश्यक होते.

नगर परिषद, नगर पालिका, महानगरपालिकांमधील ज्या वॉर्डमधून नगरसेवकांना जो निधी मंजूर होतो तो खर्च करताना संबंधित अधिकाऱ्यांनी आणि नगरसेवकांनी वॉर्डसभेची मान्यता न घेता निधी परस्पर खर्च केला तर वॉर्डसभा नगरसेवकांना परत बोलावील आणि अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही होईल असा कायदा होणे आवश्यक आहे असे अण्णा हजारे यांचे मत होते.[१]

अशा प्रकारे अण्णांनी सामाजिक प्रश्न, समस्या यांची नोंद घेऊन समाजात, शासनात, प्रशासनात होणाऱ्या अनागोंदी कारभाराला प्रतिबंधक माहितीचा अधिकार, ग्रामसभेचा अधिकार, दप्तरदिरंगाईचा कायदा, बदल्यांसंबंधीचा कायदा यांची आवश्यकता प्रतिपादन केली आणि सरकारशी सतत पत्रव्यवहार, उपोषणे, आंदोलने, संघर्ष करुन ते कायदे पारित करुन घेतले. स्वच्छ पारदर्शक लोकशाहीच्या दिशेने पडलेले ते एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. अर्थात त्यासाठी सरकारशी, भ्रष्टाचारी प्रवृत्तीच्या लोकांशी अण्णा हजारे यांना सतत संघर्ष करावा लागला; पण अण्णा हजारे इ

ुकले नाहीत, वाकले नाहीत, जनहितार्थ कायदे करण्यास सरकारला भाग पाडले. या सर्व कायद्यांचा अभ्यास आपल्याला या प्रकरणात करायचा आहे.

## ५.२ माहितीचा अधिकार, ग्रामसभा व इतर कायद्यांसाठी केलेल्या प्रयत्नांचा तपशील.

युती शासन : मा. मनोहर जोशी व नारायण राणे मुख्यमंत्री असताना केलेले प्रयत्न :

दिनांक १४ मार्च १९९५ ला युती सरकार सत्तेवर आल्यानंतर दिनांक ११ ऑगस्ट १९९५ रोजी भ्रष्टाचारास प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने पहिले पत्र अण्णा हजारे यांनी सरकारला लिहिले. त्यानंतर १२ जानेवारी १९९८ पर्यंत वरील विषयी १२ ते १५ वेळेला पत्रव्यवहार केला.

माहितीच्या अधिकारासाठी दि.१२ जानेवारी १९९८ पर्यंते पत्र व्यवहाराव्दारे सरकारला निवेदन दिल्यानंतर ३ महिन्यांनी दि. ०६ एप्रिल १९९८ ला आझाद मैदान, मुंबई येथे महाराष्ट्रातील सर्व कार्यकर्त्यांसह अण्णा हजारे यांच्या नेतृत्त्वात पहिले धरणे आंदोलन झाले. त्यानंतर ०२ ऑगस्ट १९९९ पर्यंत ७ ते १० वेळेला अण्णांनी सरकारशी पत्रव्यवहार केला.

### ५.२.१ आघाडी सरकार : मा. विलासराव देशमुख व मा. सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री असताना अण्णा हजारे यांनी केलेले प्रयत्न

दिनांक १८ ऑक्टोबर १९९९ रोजी आघाडी सरकार सत्तेवर आले. वरील विषयासंबंधाने दि.१८ नोव्हेंबर १९९९ रोजी पहिले पत्र दिले. स्मरणपत्र ४ ते ५ वेळेस देण्यात आले. कार्यवाही होत नाही म्हणून दि.०६ एप्रिल २००० ला सरकारला पत्र देऊन दिनांक १ मे २००० रोजी धरणे आंदोलन व दिनांक २० मे २००० पासून उपोषण, आंदोलन करण्यासंबंधी सरकारला इशारा दिला. दि.२ मे २००० रोजी पुण्यासह इतर सहा विभागांत जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर धरणे आणि घंटानाद आंदोलन झाली. दिनांक २० मे २००० रोजी लोकसभेत माहिती स्वातंत्र्याचे ठराव पारित झाल्यामुळे व मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या १ मे २००० च्या पत्राच्या लेखी आश्वासनानुसार २० मे २००० पासून अण्णा हजारे यांनी अन्नवर्ज्य आंदोलन स्थगित केले. कार्यवाही व्हावी यासाठी एकूण १४ वेळेला पत्रव्यवहार केल्यानंतर कार्यवाही होत नाही, म्हणून एक वर्षाने म्हणजे १ मार्च २००१ रोजी सरकारला पत्र देऊन दि. १ मे २००१ पासून मौन आंदोलन करण्याचा इशारा अण्णा हजारे यांनी सरकारला दिला होता; पण तत्पूर्वी म्हणजे २६ एप्रिल २००१ रोजी वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली व सरकारकडून आश्वासन देण्यात आले.

बैठकीत दिलेली आश्वासने न पाळल्यामुळे सदर बैठकीनंतर म्हणजे ८१ दिवसांनी दि. २१ जुलै २००१ रोजी अण्णा हजारे यांनी सरकारला स्मरणपत्र देऊन दि. ९ ऑगस्ट २००१ पासून राळेगणसिध्दी येथे मौन आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. सरकारने आश्वासनाप्रमाणे कार्यवाही न केल्याने ठरल्याप्रमाणे दि. ९ ऑगस्ट २००१ पासून राळेगणसिध्दी येथील संत यादवबाबा मंदिरामध्ये अण्णांनी मौन आंदोलन सुरु केले. चार दिवसांनी म्हणजेच दिनांक १२

ऑगस्ट २००१ रोजी श्री. विलासराव, काका उंडाळकर - पाटील यांच्या व मुख्य सचिव यांच्या आश्वासनानंतर मौन आंदोलन स्थगित करण्यात आले.

वरील दिलेली आश्वासने न पाळल्यामुळे पुन्हा, त्यानंतर एक वर्ष एक महिन्यापर्यंत १७ वेळा पत्रव्यवहार करुन सरकारला अण्णा हजारे स्मरण करुन दिले. दिनांक १३ सप्टेंबर २००२ रोजी पत्र देऊन गणेश विसर्जनानंतर दि. २१ सप्टेंबर २००२ ला पुन्हा अण्णा हजारे यांनी मौन आंदोलन सुरु केले. ५ दिवसांनी म्हणजेच २५ सप्टेंबर २००२ ला श्री. दिलीप वळसे पाटील, श्री. शिवाजीव कर्डिले, श्री. शिवाजीराव मोघे, श्री. आर. आर. पाटील हे राळेगणसिध्दी येथे येऊन यांच्या मध्यस्थीने मुख्य सचिव व मुख्यमंत्री यांच्या आश्वासनानंतर मौन आंदोलन स्थगित केले. १०० दिवसांनंतर व आघाडी सरकार सत्तेवर आल्यापासून ते २ जानेवारी २००३ पर्यंत वरील विषयासंबंधाने ७१ वेळेला स्मरणपत्र देऊन अण्णा हजारे यांनी सरकारशी पत्रव्यवहार केला.

२५ सप्टेंबर २००२ च्या स्थगित झालेल्या मौन आंदोलनानंतर ३५ दिवसांनी म्हणजेच ३० ऑक्टोबर २००२ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीत आश्वासनांची पूर्तता व्हावी म्हणून सतत ३ महिने १७ दिवस वाट पाहून ९ जानेवारी २००३ ला पत्र देऊन २० फेब्रुवारी २००३ मध्ये आंदोलनाचा इशारा दिला; परंतु राजकीय घडामोडीमुळे मुख्यमंत्री बदलण्यात आले. नवीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी वरील सर्व प्रश्नी दि. १७ फेब्रुवारी २००३ रोजी मंत्रालयामध्ये सर्वांसमवेत बैठक घेऊन सदर प्रश्न कालमर्यादा देऊन सोडविण्यात येतील असे आश्वासन सरकारच्या वतीने दिले.

दिनांक १७ फेब्रुवारी २००३ च्या बैठकीतील आश्वासनांचे स्मरण त्यानंतर ४ ते ५ वेळा सरकारशी पत्रव्यवहार करुन दिले; परंतु या प्रश्नी काही मार्ग निघेल असे वाटत नसल्याने दिनांक १६ जुलै २००३ रोजी श्री. सुशीलकुमार शिंदे मंत्रिमंडळाला पत्र देऊन दिनांक ९ ऑगस्ट २००३ रोजी क्रांती दिनापासून मुंबई येथे उपोषण करण्याचा इशारा अण्णा हजारे यांनी सरकारला दिला.

दिनांक ९ ऑगस्ट २००३ पर्यंत काहीच कार्यवाही झाली नसल्याचे समजताच नाइलाजास्तव आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण केले. ९ दिवसांनंतर म्हणजेच दिनांक १७ ऑगस्ट २००३ रोजी मुख्यमंत्री व मुख्य सचिवांच्या लेखी आश्वासनानंतर श्री. तुकारामदादा गीताचार्य यांच्या हस्ते उपोषण सोडण्यात आले.

या वेळीही दिलेली आश्वासन न पाळल्याने परत ३५ दिवसांनी सदर आश्वासनांचे स्मरण म्हणून २४ सप्टेंबर २००३ रोजी पत्र देण्यात आले. त्यानंतर ६ वेळा सरकारशी अण्णा हजारे यांनी पत्रव्यवहार करुन शेवटी दिनांक १ जानेवारी २००४ रोजी नाइलाजास्तव २६ जानेवारी २००४ पासून राळेगणसिध्दी येथे मौन व दिनांक ९ फेब्रुवारी २००४ पासून उपोषण करण्याचा इशारा अण्णा हजारे यांनी सरकारला दिला.

दिनांक २६ जानेवारी २००४ पर्यंत काहीच कार्यवाही होत नसल्याने ११ दिवसांचे मौन राळेगणसिध्दी येथे करुन दिनांक ५ फेबुवारी २००४ रोजी समाप्त केले व त्यानंतर दिनांक ९ फेब्रुवारी २००४ पासून उपोषण सुरु करण्यात आले. सदर उपोषण ९ दिवसांनी म्हणजे दिनांक १८

फेब्रुवारी २००४ रोजी श्री. आर. आर. पाटील, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. उमेशचंद्र सरंगी यांच्या मध्यस्थीने व मुख्यमंत्री व मुख्य सचिव यांच्या आश्वासनानुसार स्थगित करण्यात आले.

त्यानंतर सदर आश्वासनासंबंधी मा. मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली यशदा, पुणे येथे दिनांक २७ फेब्रुवारी २००४ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीतही आश्वासन देऊन यासंबंधी आढावा समिती गठित करुन कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले; परंतु सदर आढावा समितीकडून अपेक्षित असे कार्य होत नसल्याचे जाणवत असल्याने पुन्हा दिनांक ८ जून २००५ रोजी पत्र देऊन, दिनांक ९ ऑगस्ट २००५ पासून उपोषण सुरु करण्याचे ठरवले. पुन्हा २३ जुलै २००५ रोजी मंत्रालयात बैठक होऊन दिवाळी अधिवेशानात कायदे होतील असे आश्वासन सरकारकडून अण्णा हजारे यांना मिळाले. सदर बैठकीचा आढावा मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ३० सप्टेंबर २००५ रोजी घेण्यात आला. आश्वासन न पाळल्याने पुन्हा २५ डिसेंबर २००५ पासून उपोषण सुरु व आश्वासन मिळाल्यानंतर दि. ०३ जानेवारी २००६ रोजी उपोषण स्थगित केले.

वरील सर्व प्रकरणांतून लक्षात येईल, की १४ मार्च १९९५ पासून २५ डिसेंबर २००५ पर्यंत दहा वेळेला वेगवेगळी आंदोलने अण्णा हजारे यांना करावी लागली. सरकारने वेगवेगळी आश्वासने दिली; मात्र ती सरकारनेच पाळली नाहीत. त्यामुळे अण्णा हजारे यांना पुन्हा पुन्हा आंदोलने करावी लागली. सदर आंदोलनांमुळे काही लोकांनी अण्णा हजारे यांच्या संदर्भात अपप्रचारही केला. अण्णा हजारेला उपोषणाची सवय झाली आहे, ती फॅशन झाली आहे.

उपोषणामुळे आंदोलनाची धार बोथट होत चाचली आहे. अशा प्रकारे अण्णा हजारे यांच्या आंदोलनाची टिंगलटवाळी करण्यात आली; मात्र अण्णा हजारे यांच्या जीवनात ध्येयवाद असल्याने या टिंगलटवाळीची चिंता न करता अपमान सहन करीत ते आंदोलने करीत राहिले.[२]

### ५.२.२ माहितीचा अधिकार, ग्रामसभेला जादा अधिकार, दप्तर दिरंगाई, बदल्यांचा कायदा यासाठी अण्णा हजारे यांनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा :

| सन | तपशील | पत्र/ दौरा (संख्या/दिवस) |
|---|---|---|
| १९९१ ते ९४ | जनजागृती कार्यकर्ता बैठक भ्रष्टाचार निर्मूलनासाठी.. | १५ ते २० वेळा बैठक |
| १४ मार्च १९९५ | युती शासन सत्तेवर.. (पत्रव्यवहार सुरु) | २५ ते ३० वेळा पत्रव्यवहार |
| २० नोव्हें. १९९६ | युती शासनातील भ्रष्ट मंत्र्यांच्या विरोधी उपोषण : राळेगणसिध्दी | १२ दिवस उपोषण |
| १ डिसेंबर १९९६ ते मार्च १९९७ | जनजागृती अभियान दौरा | ९० दिवस |
| ११ जुलै ते ३० सप्टें १९९७ | संघटन बांधणी राज्यव्यापी दौरा जिल्हावार | ८१ दिवस |
| ६ एप्रिल १९९८ | मुंबई - आझाद मैदान : राज्यव्यापी धरणे आंदोलन - मुंबई | १ दिवस |
| ३० ऑक्टो. ते १४ नोव्हें. १९९८ | राज्यव्यापी जनजागृती दौरा | १५ दिवस |
| ११ऑक्टो. १९९९ | आघाडी सरकार सत्तेवार आले | १० ते १५ वेळा |

| | | |
|---|---|---|
| | (पुन्हा पत्रव्यवहार) | |
| २ मे २००० | विभागीय दौरे - १० मे माहितीच्या अधिकाराचा अध्यादेश | ७ दिवस |
| १ ते ३१ मे २००१ | माहितीचा अधिकार व इतर कायदे इत्यादी बाबत राज्यव्यापी दौरा | २६ दिवस |
| ९ ते १२ ऑगस्ट २००१ | १ ऑगस्ट ते ८ ऑगस्ट मौन, ९ ऑगस्ट पासून उपोषण | ४ दिवस उपोषण |
| २१ सप्टें.२००२ | गणपती विसर्जनानंतर मौन व २३ सप्टें. ०२ | पत्रव्यवहार सुरुच |
| जानेवारी २००३ | मुख्यमंत्रिपदात बदल - २६ जानेवारी आंदोलन स्थगित | ७१ वेळा पत्रव्यवहार |
| ०३ ते ०४ जुलै २००४ | जिल्हा, तालुका, गावपातळीपर्यंत राज्यव्यापी दौरा १५००० कि.मी. प्रवास | ४० दिवस |
| १ ते ८ ऑगस्ट २००३ | मौन आंदोलन - राळेगणसिध्दी | ९ दिवस |
| १ ते १७ ऑगस्ट २००३ | माहितीच्या अधिकारासाठी ‘करेंगे या मरेंगे’ आंदोलन - उपोषण | ९ दिवस, आझाद मैदान, मुंबई |
| २६ जानेवारी २००४ | प्रभावी अंमलबजावणीकरिता ११ दिवस मौन, ९ ते १८ फेब्रुवारी ०४ पर्यंत उपोषण | ९ दिवस उपोषण |
| २ ते २२ मे २००४ | माहितीचा अधिकार, संघटन बांधणी दौरा ६००० कि.मी. प्रवास. | २० दिवस |
| ३ जाने. ते २६ फेब्रु. २००५ | युवा जागृती अभियान ११००० कि.मी. प्रवास | ४६ दिवस |

| | | |
|---|---|---|
| १ ते ३१ जुलै २००५ | अण्णा हजारे वारंवार आंदोलने का करतात? जनजागृती अभियान | ३० दिवस |
| १४ ते २६ जुलै २००५ | केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मंजूर | |
| १२ ऑक्टो. २००५ (दसरा) | माहितीचा अधिकार कायदा भारतास लागू जम्मू काश्मीर वगळून | |
| २५ डिसें. ते ३ जाने. २००६ | प्रभावी अंमलबजावणीकरिता उपोषण | १० दिवस उपोषण |
| ९ ते १९ ऑगस्ट २००६ | मा.अ.का. दुरुस्तीच्या विरोधात उपोषण (श्री क्षेत्र आळंदी) पुणे | ११ दिवस उपोषण |
| १४ सप्टें. ते ११ नोव्हें. २००६ | राज्यव्यापी जनजागृती दौरा (संपूर्ण महाराष्ट्र) १६००० कि.मी. प्रवास. | ५८ दिवस |
| ४ मार्च ते ६ जून २००६ | माहितीचा अधिकार, ग्रामसभा जनजागृती अभियान (१० जिल्हे) १०,००० कि.मी.प्रवास कोल्हापूर, सांगली, अमरावती, वाशीम, हिंगोली, जालना, औरंगाबाद, नाशिक, पुणे, नंदूरबार | ९५ दिवस |
| १२ सप्टें ते २ नोव्हें. २००७ | माहितीचा अधिकार, ग्रामसभा जनजागृती अभियान (६ जिल्हे) सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, परभणी, बीड, सातारा ८८०० कि.मी. प्रवास[३] | ६२ दिवस. |

## ५.३ माहितीचा अधिकार : जनस्वातंत्र्याची दुसरी लढाई

व्यापाराच्या उद्देशाने आलेल्या इंग्रजांनी प्रथम आपल्या देशात ठिकठिकाणी आपल्या वखारी स्थापन केल्या. व्यापारी केंद्रे स्थापन केली. व्यापार करता करता 'फोडा आणि झोडा' या कपटनीतीतून भारतभर आपली सत्ता स्थापन केली. भारतीय जनतेला आपले गुलाम बनवले. भारतीय साधनसंपत्तीची अधिक लूट करता यावी, अधिकाधिक शोषण करता यावे, याचा कुणाला थांगपत्ता लागू नये, तसेच भारतातील आपली शोषणयुक्त सत्ता अबाधित राहावी आणि सत्तेची पकड अधिक मजबूत व्हावी यासाठी ब्रिटिश सरकारने १९२३ साली कार्यालयीन गोपनीयतेचा कायदा (ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट) तयार केला. या कायद्याच्या आधारावर भारतमातेला लुटून त्यांनी आपल्या तिजोऱ्या भरल्या. जनतेवर अनन्वित अन्याय व अत्याचार केले. गोपनीयतेच्या कायद्यामुळे जनतेला दाद मागता येईना. न्याय मिळेनासा झाला. जनता हतबल झाली. ब्रिटिशांची जुलमी सत्ता उलथवून टाकून अनेक क्रांतिकारी देशभक्तांनी बलिदान केले. अनेक सत्याग्रहींनी आपले रक्त सांडले. ब्रिटिश सरकारच्या अन्यायाने परिसीमा गाठली. १९४२ च्या चलेजाव आंदोलनाचा वणवा देशाच्या कानाकोपऱ्यात पोचला. आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी या आंदोलनात उड्या घेतल्या. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली 'करेंगे या मरेंगे' असा नारा देत अवघा हिंदुस्थान आंदोलनात उतरला. आंदोलकांनी जेल भरुन गेले. या आंदोलनाने ब्रिटिश सत्ता हादरली. आता अधिक काळ हिंदुस्थानावर आपल्याला राज्य करता येणार नाही याची जाणीव ब्रिटिश सरकारला झाली. याचा परिणाम म्हणून १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाला.

१९४७ साली अत्याचारी गोरे ब्रिटिश आपले चंबूळगबाळं आवरुन हिंदुस्थानापासून निघून गेले. नंतर १९५० साली लोकशाही पध्दतीने भारताचा घटनात्मक राज्यकारभार सुरु झाला. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने स्वतंत्र, सार्वभौम, प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. दरवर्षी तो आपण साजरा करतो. राष्ट्र प्रजासत्ताक झाले, राष्ट्राचे स्वामित्व कागदोपत्री प्रजेकडे आले; परंतु खरोखर प्रत्यक्ष प्रजेच्या हातात सत्ता आली काय? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल. भारत स्वतंत्र प्रजासत्ताक देश असल्याचे जग मानते. त्याला प्रजातंत्र, गणतंत्र, गणराज्य अथवा लोकशाही या नावानेही संबोधले जाते. देशाचा राजयकारभार जनता चालवू शकत नाही. त्यासाठी जनता मतदान करुन कारभार चांगल्या रीतीने चालविण्यासाठी व जनतेचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास करण्यासाठी आपले प्रतिनिधी मतदानाने निवडून देते. केंद्रसरकारात आपण खासदार निवडून देतो. राज्य चालविण्यासाठी आपण आमदार निवडून देतो. यातून केंद्र सरकारचे - राज्य सरकारचे मंत्रीमंडळ बनते. जसे एखादा उद्योग चालविण्यासाठी मालक कामगार नेमतो, त्याप्रमाणे राष्ट्राचे मालक असलेले मतदार खासदार - आमदारांची निवड करतात. म्हणून खासदार, आमदार आपले मालक नसून राष्ट्रसेवा व जनसेवेसाठी आपणच निवडून दिलेले आपले सेवक आहेत. तसेच प्रशासकीय यंत्रणा चालविण्यासाठी नेमलेले सर्व सनदी, राजपत्रित अधिकारी, कर्मचारीही आपले सेवक आहेत. कररुपाने जमा झालेल्या पैशातून त्यांचा पगार भागविला जातो; परंतु जनतेला हे कधी समजलेच नाही. कुणी समजू दिले नाही. त्याचे कारण १९२३ मध्ये इंग्रजांनी हिंदुस्थानची लुटमार करण्यासाठी केलेला गोपनीयतेचा कायदा होय. तो

स्वतंत्र लोकशाही भारतात स्वातंत्र्याला ६० वर्षे पूर्ण झाली तरी तसाच अंमलात राहिला. तो कालबाह्य कायदा न बदलल्याने सत्ता राज्यकर्ते आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या हातातच एकवटली. जनतेच्या हातात फक्त पाच वर्षांतून एकदा मतदान करण्याचा अधिकार राहिला. गोपनीयतेचा कायदा भारतीय लोकशाहीचा मोठा शत्रू बनला. या कायद्याने घटनेने नागरिकांना दिलेले स्वातंत्र्य हिरावून घेतले. जनतेला अंधारात ठेवून भ्रष्ट मार्गाने माया जमविण्याचे व जनतेच्या कल्याणाऐवजी जनतेची ससेहोलपट करण्याचे शस्त्र गोपनीयतेच्या कायद्याच्या रुपात अधिकाऱ्यांच्या हाती आले. घटनेने दिलेल्या अधिकारापासून या कायद्यामुळे जनता वंचित राहिली.

संरक्षणखाते, परराष्ट्रीय धोरण, जातीय तेढ निर्माण करणाऱ्या बाबी गोपनीय ठेवल्याच पाहिजेत; मात्र विविध विकासाच्या गोष्टी गोपनीय ठेवणे लोकशाही देशात अयोग्य आहे. मग ब्रिटिशांच्या जुलूमशाहीत आणि आपल्या लोकशाहीत फरक करता येणार नाही. भ्रष्टाचारी मार्गाने देशाची लुबाडणूक करणे चालूच आहे. जनहिताविरुध्द निर्णय घेणारे गोरे देशातून गेले आणि काळे आले एवढाच काय तो फरक जाणवतो. गोपनीयतेच्या कायद्यामुळे सर्वच शासकीय यंत्रांत माहिती लपविली जात होती. गरीब परिवारातील युवक नोकरीसाठी सेवायोजन केंद्रामध्ये मध्ये नाव नोंदवितात. दहा-दहा वर्षे वाट पाहूनही त्यांना मुलाखत पत्र ही येत नाही. कारण अधिकाऱ्यांचा खिसा गरम करणाऱ्या प्रतीक्षा यादीबाहेरच्या व्यक्तींचा विचार केला एमपीएससीसारख्या मामलेदार, फौजादार, बी.डी.ओ. या पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत गडबडी होतात. सरकारी

खात्यात, महापालिका, नगर पालिका, जिल्हा परिषदा यांत कारकून किंवा शिक्षक भरतीसाठी जास्त पैसे मोजणाऱ्या अपात्र उमदेवारासही नोकरी लागते; पात्र उमेदवार पैसे देऊ शकत नसल्याने त्यांचा विचार होत नाही. विद्यापीठात काही वेळाला पदव्यांची खोटी सर्टिफिकेट्स दिली जातात. वितरण व्यवस्थेमधील रॉकेल, रेशनिंग, साखर, गॅस सांरख्या जीवनावश्यक वस्तू ग्राहकापर्यंत पोचू शकत नाही. त्या मधल्या मध्ये गडप होतात. तक्रार केली तर कुणी दखल घेत नाही. एखाद्या कामावर किती खर्च झाला त्याची माहिती मिळू शकत नाही. सरकारी तिजोरीत कररुपाने जमा होणारा पैसा ज्या ज्या क्षेत्रांत वितरित होतो मग ते शिक्षणक्षेत्र असेल, कृषिक्षेत्र असेल, आरोग्य क्षेत्र असेल, विविध महामंडळे असतील किंवा सहकार क्षेत्र असेल, त्याच्या विनियोगाची माहिती घेण्याचा अधिकार लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला आहे; परंतु तो गोपनीयतेच्या बुरख्याखाली डावलला जातोय. देश आणि राज्याच्या संपत्तीचे विश्वस्त म्हणून आपण लोकप्रतिनिधींना निवडून देतो. प्रशासकीय अधिकारी जनतेचे सेवकच आहेत. महात्मा गांधींनी हेच विचार सांगितले होते; पण आज विश्वस्त आपल्या खुर्चीत मस्त आहेत. जनतेचे सेवक असलेले अधिकारी मालक बनले आहेत. सरकारी तिजोरीवरील ‘धनभक्षक भुजंग’ बनले आहेत. त्याचा परिणाम भ्रष्टाचार बोकाळण्यात झाला. स्वातंत्र्याचा लाभ जोपर्यंत तळातल्या गरीब माणसापर्यंत पोचत नाही, तोपर्यंत स्वातंत्र्याला काही अर्थ नाही, असे गांधींनी म्हटले आहे. ब्रिटिशकाळात देश पारतंत्र्यात होता व जनताही गुलामगिरीत होती. आता देश स्वातंत्र्य झाला असला तरी जनता गुलामगिरीत आहे, असे आचार्य विनोबा भावेंनी म्हटले होते.

तोंडावर पैसा फेकला, की धनवंताचे काम पटकन होते. वर्षानुवर्षे सरकार दरबारी हेलपाटे घालूनही सामान्य माणसांची कामे होत नाहीत. त्याला सरकारदरबारात भिकाऱ्यासारखी वागणूक दिली जाते अशी परिस्थिती आहे. कररुपाने जमा होणाऱ्या सरकारी तिजोरीतल्या मालावर निकृष्ट दर्जाची कामे करुन डल्ला मारला जातो आहे. कामात पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा राहिलेला नाही.

कमाईच्या जागेवर बदली होण्यासाठी वरपर्यंत भली मोठी रक्कम मोजावी लागते, असे ऐकिवात आहे. अशा हजारो तक्रारी अण्णांकडे आल्या. त्या वेळी पारतंत्र्यातून भूमी स्वातंत्र्य झाली तरी जनतेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी महात्मा गांधींच्या अहिंसक मार्गाने आपल्याला दुसरी लढाई लढावी लागेल याची तीव्रतेने जाणीव अण्णा हजारे यांना झाली ती लढाई म्हणजे माहितीच्या अधिकाराची लढाई होय. त्याशिवाय भ्रष्टाचारासारख्या सर्व प्रकारच्या अनिष्ट गोष्टींना आळा बसणार नाही. हे विचार अण्णा हजारे यांच्या मनात आले. त्यासाठी १२ वर्षांपूर्वी लढाई सुरु झाली. प्रथम अर्जविनंत्या केल्या. माहितीच्या अधिकाराचा कायदा करावा यासाठी १९९५ पासून सरकारशी पत्रव्यवहार सुरु झाले; पण सरकारने दखल घेतली नाही. त्यासाठी नाइलाजाने उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागला. पहिले उपोषण १९९७ मध्ये मुंबईला आझाद मैदानावर झाले. माहितीच्या अधिकाराबरोबर ग्रामसभेला जादा अधिकार, वॉर्डसभेचा अधिकार, सरकारी कार्यालयातील दिरंगाईला आळा घालणे, अधिकाऱ्यांच्या बदलीचा कायदा हे जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न अण्णा हजारे यांनी लावून धरले. उपोषण आणि आंदोलनाने मोठ्या प्रमाणात

लोकजागृती झाली. आपले स्वातंत्र्य गोपनीयतेच्या कायद्याच्या जाळ्यात अडकलेले आहे, हे जनतेच्या लक्षात आले. आंदोलन साऱ्या महाराष्ट्रात पसरले. तेव्हा सरकारचे डोके थोडे ठिकाणावर आले. मुख्यमंत्री, मंत्री आणि अधिकाऱ्यांसमवेत अनेक बैठका झाल्या. सरकारने २००० मध्ये माहितीच्या अधिकाराबाबत एक कायदा केला; परंतु तो असून नसल्यासारखा होता. म्हणून पुन्हा अण्णा हजारे यांनी आंदोलन करावे लागले. सरकारने कायद्याचा मसुदा बदलून पुन्हा तो सुधारित करण्याचे ठरविले; परंतु सरकारी अधिकाऱ्यांनी कायद्याचा मसुदा तयार न करता त्यासाठी बिगर सरकारी तज्ज्ञांची कमिटी नेमा अशी मागणी अण्णा हजारे यांनी केली. त्याप्रमाणे सरकारने कमिटी नेमली. त्यात शासनाचे प्रतिनिधी होते. त्याचबरोबर अण्णा हजारे यांनी ज्यांची नावे सुचविली त्यात श्री. माधवराव गोडबोले, प्राचार्य सत्यरंजन साठे, विजय कुवळेकर आदींचा कमिटीत समोवश होता. राजस्थान, तामिळनाडू, कर्नाटक, मध्य प्रदेश व गोवा राज्य सरकारांनी केलेल्या माहिती अधिकार कायद्याचा अभ्यास केला. आदर्श असा मसुदा तयार केला; परंतू काहींना हा कायदा जाचक व गैरसोयीचा वाटल्याने महाराष्ट्र सरकार माहितीचा अधिकार कायद्याचा ठराव विधानसभेत आणायला तयार हाईना. त्यासाठी पुन्हा आंदोलनाचे रणशिंग अण्णा हजारे यांना फुंकावे लागले.

आंदोलनानंतर तयार झालेले विधेयक गरज नसताना राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठविले. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी व गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांची भेट घेऊन केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. त्यांनी ते विधेयक राष्ट्रपतींकडे पाठविले. तेथे बराच काळ

विधेयक रेंगाळले. म्हणून पुन्हा ९ ऑगस्ट २००३ या दिवशी मुंबईला आझाद मैदानावर ‘करेंगे या मरेंगे’ या ध्येयाने अण्णांना उपोषणास बसावे लागले. उपोषणाच्या बाराव्या दिवशी राष्ट्रपतींनी विधेयकावर सही केली. ११ ऑगस्ट २००३ पासून माहितीच्या अधिकाराचा कायदा महाराष्ट्र राज्यासाठी लागू करण्यात आला. महाराष्ट्राचा माहितीचा अधिकाराचा कायदा आशिया खंडातला हिरावून घेतलेले अधिकार जनतेला प्रदान करणारा अतिशय प्रभावी असा कायदा आहे. या कायद्याबाबत दोन पावलं पुढे टाकून केंद्र सरकारने ऑक्टोबर २००५ पासून माहितीच्या अधिकाराचा कायदा लोकसभेत पारित करुन देशभर लागू केला.

केंद्र सरकारचा कायदा झाल्यावर अण्णा हजारे यांनी कायद्याबाबत लोकजागृती व्हावी या उद्देशाने महाराष्ट्रभर तीन वेळा अण्णा हजारे यांनी दौरे केले. कायदे अनेक असतात; परंतु ते लोकांपर्यंत पोचत नाहीत. त्याबद्दल लोक अनभिज्ञ असतात. जनतेला माहितीचा अधिकार कायदा कळावा, आपले स्वातंत्र्य आणि हक्क याची जाणीव व्हावी हाच या दौऱ्यांचा उद्देश होता. त्यासाठी अनेक ठिकाणी अण्णा हजारे सभा घेतल्या. लाखो युवकांशी सुसंवाद साधला.

केंद्र सरकारचा माहितीचा अधिकार-२००५ यात काही दुरुस्त्या करण्यास केंद्रीय मंत्री मंडळाने मान्यता दिली. हा कायदा प्रभावहीन करण्याचा तो प्रयत्न होता. कायदा आपल्या मनमानीला वेसण घालणारा असल्याचे काही वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधींना वाटले असावे. त्यामुळे दुरुस्त्यासाठी त्यांनी पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्यावर दबाव आणला असावा, असे अण्णांचे मत होते.

या दुरुस्त्यांसह सुधारित माहितीचा अधिकार कायदा लोकसभेत मंजुरीसाठी तयार होता. माहिती अधिकार कायद्यातील दुरुस्त्या म्हणजे या कायद्यातील आत्माच काढून टाकण्यासारखे होते. २००५ च्या मूळ कायद्यातून - १.सरकारी फायली वरील नोंदी व शेरे, २. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची प्रक्रिया, ३. सल्ला देणाऱ्या व्यक्तीची माहिती, ४. सार्वजनिक प्राधिकरणाकडे विविध नेमणुकांसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षा, ५. अभियांत्रिकी, वैद्यकीय व्यवस्थापन अशा अभ्यासक्रमातील प्रक्रिया, ६. एखाद्या प्रकरणावर अंतिम निर्णय होईपर्यंत त्याबाबतच्या नोंदी, दस्तऐवज उतारे, हस्तलिखित फाईल त्याबाबत शिफारस व सल्ला या बाबी माहितीच्या अधिकार कायद्यातून वगळण्यात येणार होत्या. त्याबाबत जनतेला माहिती

मिळण्याबाबतचा मूलभूत हक्कच नाकारण्यात येणार होता. माहितीचा कायदा निष्प्रभ व प्रभावहिन करण्याचा हा प्रयत्न होता. त्यामुळे फायलीतील कोट्यवधी रुपयांचा होणारा भ्रष्टाचार दडपला जाण्याची संधी आपोआप सरकारशी संबंधितांना मिळाली असती. प्रस्तावित दुरुस्तीनंतर मुख्य माहिती आयुक्तांचे (चिफ कमिशनर) दंडात्मक कारवाईचे अधिकार काढून घेण्यात आले असते. त्यांना सरकारी परवानगीशिवाय कारवाई करता आली नसती. असे केंद्रीय गोपनीय कायद्याचे छुपे रुप राहिले असते. म्हणून माहिती कायदा सुधारित ठरावाला तीव्र विरोध करण्याचे अण्णा हजारे यांनी ठरविले.

‘माहितीचा अधिकार २००५ कायद्यात बदल केल्यास उर्वरित कायद्याला काही अर्थ उरणार नाही. ही जनतेची फसवणूक आहे. त्यामुळे जनतेचे स्वातंत्र्य हिरावून घेतल्यासारखे होईल. म्हणून

माहितीच्या कायद्यातील दुरुस्त्यांचा पुनर्विचार व्हावा. शासनाने दुरुस्त्यांचा प्रस्ताव मंजूर केलाच, तर त्याविरुध्द जनतेला आंदोलन करणे भाग पडेल. या आंदोलनामुळे उद्‌भवणाऱ्या परिस्थितीला शासनच जबाबदार राहील. तरी कृपया माहितीचा अधिकार कायद्यास सुचविलेल्या दुरुस्त्या मागे घेण्यात याव्यात. त्यासाठी आंदोलनाची पाळी येऊ देऊ नये.' अशा आशयाचे पत्र दि.२६ जुलै २००६ रोजी अण्णा हजारे यांनी पंतप्रधानांना पाठवले. त्याला लगेच २७ जुलै २००६ ला पंतप्रधान मनमोहनसिंग यांचे उत्तर आले. पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या उत्तराने अण्णा हजारे यांचे समाधान झाले नाही.

पंतप्रधानांनी पाठविलेल्या उत्तरातून अण्णांच्या मनाचे समाधान न झाल्याने माहितीच्या कायद्यातील बदलाला विरोध करण्यासाठी दि. ९ ऑगस्ट या क्रांतिदिनी ऑगस्ट क्रांती मैदानावर उपोषण करण्याचा निर्णय अण्णा हजारे यांना घ्यावा लागला. पुरातत्त्व खात्याने व मुंबई महापालिकेने परवानगी नाकारल्याने शेवटी माऊलींच्या पवित्र भूमित आळंदी येथे ८ ऑगस्ट रोजी अण्णा हजारे यांचे उपोषण सुरु झाले. उपोषणामुळे समाजात मोठ्या प्रमाणात जागृती झाली. विविध संस्था, संघटना आंदोलनात उतरल्या, लोक रस्त्यांवर येऊन आंदोलन करु लागले. महाराष्ट्रात नऊ ठिकाणी रेल्वे रोको आंदोलन झाले. आंदोलनाचे लोण देशभर पसरले. अमेरिकेत अनेक भारतीयांनी अण्णा हजारे यांच्या आंदोलनास पाठिंबा देत उपोषण सुरु केले. अनेक जिल्ह्यांत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घंटानाद करण्यात आला. व्ही. पी. सिंग, मार्क्सवादी कम्युनिस्ट

पक्षाचे नेते सीताराम येचुरी, यांनी आंदोलनाला पाठिंबा व्यक्त केला. मॅगसेसे पुरस्कार विजेते अरविंद केजरीवाल व ज्येष्ठ समाजसेविका अरुणा रॉय यांचाही आंदोलनात मोठा सहभाग होता.

फायलींवरील मंत्री व अधिकाऱ्यांच्या नोंदी पाहण्याचा अधिकार जनतेस दिला तर त्या अधिकारांचा गैरवापर होईल. काही स्वार्थी लोक ब्लॅकमेलिंग करतील. त्यामुळे फायलींवरील नोंदी माहितीच्या अधिकार कायद्यातून वगळणे योग्य आहे, असा युक्तिवाद सरकारकडून करण्यात आला. त्या वेळी कायद्याचा गैरवापर करणाऱ्याविरुध्द पोलिस तक्रार दाखल करण्याची त्यांना अण्णा हजारे यांनी सूचना केली. तसेच आपला कारभार स्वच्छ असेल तर ब्लॅकमेलिंगला भीक घालण्याचे कारण नसल्याचे अण्णा हजारे यांनी स्पष्ट केले.

उपोषणाच्या पाचव्या दिवशी अण्णा हजारे यांचे वजन घटले. प्रकृती खालावल्याच्या नावाखाली त्यांना जबरदस्तीने रुग्णालयात दाखल करुन उपोषण खंडित करण्याचा डाव सरकारने रचला. अण्णा हजारे यांना अर्धवट झोपेत असताना रात्री साडेबारा वाजता उठवण्यात आले. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शाखा चिकित्सकांनी अण्णांना जबरदस्तीने रुग्णवाहिकेत बसवण्याचा प्रयत्न केला. त्याला कार्यकर्त्यांनी प्रखर विरोध केला. जबरदस्तीने रुग्णालयात हलविले तर मी पाणी घेण्याचे सोडून देईन. तसेच कोणतेही उपचार घेणार नाही, असे अधिकाऱ्यांना अण्णा हजारे यांनी निक्षून सांगितले. त्यामुळे उपोषण खंडित करुन आंदोलन निष्प्रभ करण्याचा त्यांचा प्रयत्न फसला.

'करेंगे या मरेंगे' या जिद्दीतून अण्णांचे उपोषण सुरुच राहिले. कायद्यातील बदलाचा प्रस्ताव मागे घेतल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही, हा अण्णांचा निर्धार अभंग होता. उपोषणाच्या आठव्या दिवशी पंतप्रधानांकडून चर्चेचे निमंत्रण आले. चर्चेपूर्वी उपोषण सोडा असा त्यांचा आग्रह होता; परंतू यापूर्वीचा अनुभव चांगला नसल्याने अण्णा हजारे यांनी त्यांना नकार कळविला. शेवटी उपोषणाच्या अकराव्या दिवशी १९ ऑगस्ट २००६ रोजी पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण पंतप्रधानांचा संदेश घेऊन आळंदीला आले. त्यांच्याबरोबर कृषिमंत्री बाळासाहेब थोरात होते. 'माहितीचा अधिकार २००५' यात बदल न करता, तो तसाच कार्यान्वित राहील हा लेखी मजकूर पंतप्रधानांच्या संदेशात होता. अण्णा हजारे यांचे आंदोलन अखेर यशस्वी झाले. आळंदीतील वारकरी संप्रदायाचे अनासक्त कर्मयोगी ह.भ.प. मारुतीबुवा कुऱ्हेकर यांच्या हस्ते मोसंबीचा रस घेऊन अण्णा हजारे यांचे उपोषण सुटले. राज्य व केंद्र सरकारने शासकीय कार्यालयात माहिती अधिकारी नेमण्याची व दहा आयुक्तांची नेमणूक करण्याची मागणी मान्य झ ाली. अर्जदारास माहिती नाकारणाऱ्या अधिकाऱ्यास दंड करण्याचेही मान्य करण्यात आले. जनतेला स्वातंत्र्याचा लाभ व्हावा यासाठी पुकारण्यात आलेला लढा यशस्वी झाला. तरी भविष्यात अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांनी लढाईसाठी सदैव सज्ज राहिले पाहिजे. माहितीचा अधिकार हे जनतेला प्राप्त झालेले अत्यंत प्रभावी शस्त्र आहे. जनतेने त्याचा उपयोग योग्य कारणांसाठी व आपल्यावरिल अन्याय दूर करण्यासाठी करावा असे अण्णा म्हणतात.[४]

## ५.४ माहितीच्या अधिकाराचा हक्क म्हणजे काय?

जनता आणि शासन यांचे परस्परसंबंध पूर्णतः वेगळ्या पातळीवर नेण्याचे सामर्थ्य माहितीचा अधिकार या कायद्याने नागरिकांना प्राप्त झाले आहेत. आजपर्यंत शासन सर्वाधिकारी आहे आणि जिच्यामुळे शासन चालते, ती जनता दुय्यम आहे अशीच भूमिका घेतली जात होती. शासनाचे अधिकारी आपली कामे व्यवस्थितपणे पार पाडत आहेत किंवा नाही हे आता या कायद्यामुळे जनतेला समजणार आहे. जे कर्मचारी सचोटीने व प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडतील, त्यांना या कायद्याचा कुठलाही धाक/ भीती राहणार नाही. जी माहिती संसदेला किंवा राज्य विधिमंडळाला नाकारली जाऊ शकत नाही, अशी कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीला संबंधित खात्याच्या माहिती अधिकाऱ्याने पुरविली पाहिजे व गोपनीयतेच्या नावाखाली किंवा अन्य काही कारणाने ती देण्यापासून कोणालाही वंचित ठेवता येणार नाही.

जनहित हाच उद्देश असेल तर अनेक प्रकरणांचा शोध घेता येईल; पण केवळ ब्लॅकमेलिंग करुन अधिकाऱ्याचा/ कर्मचाऱ्यांचा छळ करणे हाच उद्देश असेल तर माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग होत असल्याच्या घटना कायम घडत राहतील व छोटछोट्या प्रकरणावरुन, अनियमिततेवरुन अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना धाक दाखवून काही दिवस दहशत माजवता येईल, त्यामुळे प्रशासन स्वच्छ व गतिमान करण्याचा उद्देश सफल होणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियमाखाली माहिती मागण्याचे प्रयोजन स्पष्ट केले पाहिजे. त्या माहितीशी काहीतरी

प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध असणे अत्यंत जरुरीचे आहे. अधिनियमात त्याप्रमाणे दुरुस्ती होणे आवश्यक आहे. काही दिवसांनी तलाठी कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय किंवा तत्सम कार्यालय, जेथे कर्मचारी वर्ग अत्यंत कमी म्हणजे दोन - तीन संख्येत असतो अशा ठिकाणी सदरहू कर्मचारी कार्यालयीन कामकाजाऐवजी फक्त माहिती देण्याचेच काम करीत राहील. अवलोकन व तपासणी वा वेळ घालविणे किंवा इतर तत्सम कारण हे माहिती मागण्याचे प्रयोजन असू शकत नाही. माहिती मिळवून त्या माहितीचा चांगला उपयोग केला तर कायद्याचा उद्देश सफल होईल. ज्यांचा संबंध नाही अशा व्यक्तींना माहिती पुरविली जाते. त्यांनी या माहितीचा कोणत्या प्रकारे उपयोग केला याचा जाब देण्याची वेळ यानंतरच्या काळात येईल. अनिर्बंध विशेषाधिकार गाजविण्याचा कोणालाही कोणताही अधिकार कायद्याने दिलेला नाही.[५]

## ५.५ माहितीचा अधिकार कायद्याचा इतिहास :

भारतासह जगामध्ये ५६ देशांमध्ये नागरिकांना माहितीचा अधिकार देण्याचे कायदे बनवलेले आहेत. हा कायदा फार वर्षांपूर्वी जवळजवळ २५० वर्षांपूर्वी १७६६ मध्ये स्वीडनमध्ये लागू करण्यात आला. यानंतर शंभर वर्षांपूर्वी फ्रान्समध्ये लागू करण्यात आला. १९४६ मध्ये युनोच्या स्थापनेनंतर त्यांच्या चार्टर १९ अंतर्गत सर्व सदस्य देशातील नागरिकांना माहितीचा अधिकार प्रदान केला गेला.

या काळातच दुसरे महायुध्द संपले होते. मध्यंतराच्या काळात शांतता टिकवण्यासाठी व अजूनही दुसरा हिटलर निर्माण होऊ नये हाच या कायद्याचा उद्देश होता. १९६५ मध्ये हा कायदा अमेरिकेने लागू केला. वॉटरगेट प्रकरणानंतर यात सुधारणा करण्यात आली. सद्यपरिस्थितीत अमेरिका, लॅटिन अमेरिका, युरोपातील विविध देशांत हा कायदा लागू आहे. याच्या विपरीत मुस्लिम व कमी विकसित देशांत हा कायदा लागू झालेला नाही.

यापेक्षा आश्चर्याची बाब अशी, की लोकशाहीचा मंत्र देणाऱ्या इंग्लंडमध्ये हा कायदा २००५ मध्ये लागू झाला. १९८० मध्ये हा कायदा लागू करण्याबाबत विचार सुरु झाला व त्याची अंमलबजावणी होण्यास सन २००५ उजाडावे लागले.

## ५.६ माहिती अधिकार कायद्याचा भारतातील इतिहास :

भारतात माहिती अधिकार कायदा संसदेने १५ जून २००५ या दिवशी स्वीकृत केला. १२ ऑक्टोबर २००५ पासून यावर अंमलबजावणी करण्यास सुरवात केली गेली. याअगोदर हा कायदा भारतात सर्वप्रथम तामिळनाडू राज्यात लागू करण्यात आला. त्यानंतर गोवा, कर्नाटक, आसाम, मध्य प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र या राज्यांतही माहिती अधिकार कायदा पारित करण्यात आला. भारतात १९९० मध्ये या कायद्याबाबत हालचाली सक्रिय झाल्या. यासाठी अरुणा रॉय, एच. डी. शौरी अशा कार्यकर्त्यांना १५ वर्षांपेक्षा जास्त कालावधीपर्यंत प्रयत्न करावे लागले.

सन २००२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एका जनहित याचिकेच्या निर्णयात सरकारला माहिती अधिकाराबाबत विचारणा केली व तो करणार का ? अशी विचारणा केली.

महाराष्ट्रात हा कायदा लागू करण्यासंदर्भातील सर्व श्रेय ज्येष्ठ समाजसुधारक अण्णा हजारे यांना द्यावे लागेल. २००५ च्या कायद्याअगोदर राज्यातील माहिती अधिकार कायद्यात त्रुटी होत्या. जसे माहिती मिळण्याचा कालावधी, न मिळाल्यास शिक्षेची सोय नव्हती. हा कायदा अधिकाऱ्यांच्या जास्त बाजूने झुकलेला होता.[६]

## ५.७ माहितीचा अधिकार, त्याचे स्वरुप, प्रक्रिया :

### माहितीचा अधिकार :-

माहितीचा अधिकार म्हणजे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळण्याचा अधिकार असा आहे, यामध्ये -

- एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करुन उतारे किंवा प्रमाणित प्रती घेण्याचा अधिकार,
- दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पणी, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेण्याचा अधिकार

- सामग्रीचे प्रमाणित नमुने घेण्याचा - डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हीडीओ कॅसेट या स्वरुपातील व अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती मिळवण्याचा अधिकार.
- संगणक किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेल्या माहितीच्या मुद्रित प्रती मिळवण्याच्या अधिकाराचा समावेश होतो.

**माहिती :-**

माहितीचा याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून, यामध्ये -

अभिलेख म्हणजे रेकॉर्ड

- दस्तऐवज म्हणजे मायक्रोफिल्म
- मायक्रोफिल्ममध्ये संग्रहित केलेल्या प्रतिमा
- परिपत्रके, आदेश, अहवाल, कागदपत्रे इत्यादी.
- ज्ञापने, संविदा, रोजवह्या
- अभिप्राय, सूचना
- प्रसिध्दी पत्रके, नमुने
- संगणक किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणाव्दारे तयार केलेली माहिती.
- मंत्रिपरिषदेचे निर्णय इ.

**माहिती मिळविण्याचा अधिकार :**

या कायद्यानुसार माहिती मागविण्याचा अधिकार देशातील प्रत्येक नागरिकाला आहे.[७]

**माहितीचा अधिकार कायद्याचे स्वरुप व प्रक्रिया :**

केंद्र सरकारचा माहितीचा अधिकार १२ ऑक्टोबर २००५ रोजी संमत झाला. प्रत्यक्षपणे तो १३ ऑक्टोबर २००५ रोजी भारतीय घटना अनुच्छेद १९ मध्ये मानवाधिकारांच्या अंतर्गत आहे. आता या कायद्याअंतर्गत सरकारी नियंत्रणातील जास्तीत जास्त माहिती मिळवणे नागरिकांना खुले झाले आहे. साधारण मनुष्य कुठल्याही अधिकारी किंवा मंत्र्याची फाइल, रेकॉर्ड, टिप्पणी, दस्तऐवज, आदेश, स्मरणपत्र, विश्लेषण, लॉगबुक हे सर्व बघू शकतो.

ज्या व्यक्तीस माहिती हवी आहे त्या सर्वसाधारण भारतीय नागरिकास फक्त शासकीय फीच्या प्रारुपात तयार असलेले आवेदनपत्र भरुन त्यावर निर्धारित केलेली १०/- रुपयांचे स्टँप/ तिकीट कटवावे लागते. माहितीची आवश्यकता असलेली व्यक्ती गरज असेल तर इच्छित कागदपत्र, दस्तऐवजाची सत्यप्रत मिळवू शकते. त्यासाठी प्रत्येक प्रतीस २ (दोन रुपये) झेरॉक्स/ फोटोकॉपी शुल्क द्यावे लागते.

जे लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत त्यांना कुठलेही शुक्ल देण्याची गरज नाही. फक्त त्यांनी दारिद्र्यरेषेखाली असल्याचे कागदपत्र संबंधित कार्यालयात दाखवून स्वतः दारिद्र्यरेषेखाली असल्याचे त्यास सिध्द करावे लागते.

ही व्यवस्था केंद्र, राज्य, जिल्हा, पंचायत समित्या यांच्या अखत्यारीतील सरकारी संस्थांवर लागू असेल. त्यासोबतच सरकारी अनुदानावर चालणाऱ्या संस्थांही या कायद्याच्या कक्षेत राहतील. एवढेच नाही तर जेथे सरकारचे सरळ नियंत्रण नाही अशा गणेश मंडळ, नवरात्र मंडळ, सार्वजनिक संस्था या धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या अखत्यारीत असणाऱ्या संस्थांनाही हा कायदा लागू आहे.

## ५.८ माहितीचा अधिकार कायद्याचे अधिकारक्षेत्र :

या कायद्याच्या अधिकारक्षेत्रात खालील भाग येतात :

- केंद्र व राज्य सरकारांची सर्व मंत्रालये, विभाग, खाते (गुप्तचर संघटना कार्यालय सोडून)
- पंचायतराज संस्था व स्थानिक नगर विकास संस्था
- सरकारी अनुदानावर चालणारी गैरसरकारी संस्था व कार्यालये.
- केंद्र व राज्य सरकारांकडून मंजूर केलेले मंडळ, कारखाने.
- माहिती अधिकाऱ्यांना माहिती मिळविण्याचा अर्ज मिळाल्यानंतर ४८ तासांत अर्जावर कार्यवाही करावी लागते.

- माहिती देण्याच्या कार्यात ढिलाई दाखवल्यास किंवा दिरंगाई केल्यास त्या अधिकाऱ्याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही केली जाते. तसेच दोषी अधिकाऱ्याविरुध्द दंडाची कार्यवाहीही केली जाते.
- या कायद्यामध्ये कायदा लागू झाल्यानंतर १२० दिवसांच्या आत राज्य सरकारी अधिकाऱ्यांना माहिती देण्याच्या बाबतीत योग्य ती यंत्रणा विकसित करावी लागेल.
- नागरिकांकडून मागितलेली माहिती कोणत्याही परिस्थितीत माहिती अधिकाऱ्यास ३० दिवसांच्या आत द्यावी लागते, ती देणे बंधनकारक आहे.
- माहिती मिळविण्यासाठी कोणत्याही नागरिकाकडून सादर केलेले अर्ज न घेणे, वेळेवर माहिती न देणे किंवा अर्धी, अपूर्ण माहिती देणे, चुकीची माहिती देणे, भ्रामक माहिती देणे, योग्य माहिती न देणे या सर्वांसाठी कठोर शिक्षेची तरतूद आहे.
- १९२३ चा गोपनीयतेचा कायदा व माहितीचा अधिकार कायद्यापैकी एकास निवडण्याची वेळ येईल तेव्हा माहितीचा अधिकार कायदा २००५ लाच प्राधान्य मिळेल व द्यावे लागेल.
- अपंगांना विशेष म्हणून तोंडी विचारणा केली तरी, माहिती संदर्भातील बाबींची नोंद करावीच व त्यावर माहिती पुरवावी.
- माहिती अधिकाऱ्याने माहिती कशाला पाहिजे हे विचारु नये.

- आपण माहितीशी संबंधीत नाही, असे माहिती अधिकाऱ्यास सांगता येणार नाही. माहिती अधिकारी कायद्यांतर्गत अर्ज स्वीकारुन पाच दिवसांच्या आत संबंधिताकडे पाठवून तसे माहिती मागवणाऱ्याला कळविले पाहिजे.
- अपेक्षित माहिती अभावी जीवाला धोका असल्यास अशी माहिती ४८ तासांत द्यावी लागते. यात पोलिस खात्यासंबंधीच्या माहितीचा मुख्यतः समावेश होतो.
- त्रयस्थ व्यक्तीच्या बाबतीतील माहितीसाठी जनहित लक्षात घेतले जाईल व सकारात्मक निर्णय दिला जाईल.
- माहिती अधिकाऱ्यास दोष सिध्द होण्यापूर्वी किंवा दंड लागण्यापूर्वी न्यायाच्या भूमिकेने भूमिका मांडण्याचा अधिकार आहे.
- नेटवर उपलब्ध माहिती देण्याची गरज नाही.[८]

## ५.९ माहिती मिळण्याबाबतची पध्दत :

या अधिनियमानुसार कोणतीही माहिती मिळविण्याची इच्छा असलेली व्यक्ती माहितीचा तपशील विनिर्दिष्ट करणारी, इंग्रजीमधील किंवा हिंदीमधील लेखी स्वरुपात वा इलेक्ट्रॉनिक साधनाव्दारे विहित शुल्कासह केंद्रीय शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे किंवा 'राज्य शासकीय

माहिती अधिकाऱ्याकडे' किंवा साहाय्यक शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करावा लागेल.

कलम ६ (१) नुसार माहिती मिळविण्याच्या विनंती अर्जासोबत दहा रुपयांचे शुल्क भरल्याची पावती किंवा लोक प्राधिकाऱ्याच्या, लेखी अधिकाऱ्याच्या नावे असलेला डिमांड ड्राप्ट किंवा बँकर्स चेक जोडावा.

**५.९.१ माहितीचे शुल्क :**

अ) प्रत्येक लिखित किंवा छायांकित प्रतीसाठी दोन रु. प्रति पृष्ठ.

ब) मोठ्या आकाराच्या कागदासाठी प्रत्यक्ष खर्च किंवा शुल्काची रक्कम.

क) नमुन्याचा प्रत्यक्ष खर्च किंवा किंमत.

ड) माहिती डिस्क किंवा फ्लॉपीमध्ये दिले असल्यास प्रत्येक डिस्क किंवा फ्लॉपीकरिता रुपये पन्नास.

इ) माहिती छापील नमुन्यात असल्यास अशा मुद्रणाचे विहित मूल्य.

**५.९.२ माहिती उघड करण्यातून सूट :**

या अधिनियमानुसार खालील प्रकारची माहिती देणे बंधनकारक असणार नाही. माहिती उघड करण्यातून काही प्रकारच्या माहितीस सूट देण्यात आलेली आहे.

१. जी माहिती उघड केल्याने भारताच्या सार्वभौमत्वाला किंवा राज्याच्या सुरक्षेला, युध्दतंत्रविषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक, परकीय राज्यासोबतच्या संबंधांना बाधा पोचेल किंवा अपराधास चिथावणी मिळेल अशी माहिती.

२. कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केलेली किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होईल अशी माहिती.

३. संसदेच्या किंवा राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिकाराचा भंग होईल अशी माहिती.

४. त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोचेल आणि वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता, व्यावसायिक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यांचा समावेश असलेली माहिती.

५. कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी संबंधित नसलेली किंवा एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती.

## ५.१० केंद्रीय माहिती आयोग :

केंद्रीय माहिती आयोगात मुख्य माहिती आयुक्त व दहापेक्षा अधिक नसतील इतके इतर माहिती आयुक्त असतील. मुख्य माहिती आयुक्तांची नियुक्ती राष्ट्रपतीव्दारे केली जाते. पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेता, कॅबिनेट मंत्री आदींची समिती त्या संदर्भात राष्ट्रपतीला शिफारस करते.

**५.१०.१ पात्रता :**

मुख्य माहिती आयुक्त व माहिती आयुक्त हे कायदा, विज्ञान व तंत्रज्ञान सामाजिक सेवा, व्यवस्थापन क्षेत्रामधील व अनुभवी व्यक्ती असावी. मुख्य माहिती आयुक्त हे संसदेचे व राज्यविधिमंडळाचे सदस्य नसावेत तसेच लाभाच्या पदावर नसावेत किंवा राजकीय पक्षाशी संबंधित नसावेत.

**५.१०.२ कार्यकाळ :**

प्रत्येक माहिती आयूक्त पद धारण केल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या मुदतीसाठी किंवा त्याच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत पद धारण करील.

**५.१०.३ पदच्युती :**

गैरवर्तणुकीच्या किंवा अकार्यक्षमतेच्या कारणावरुन मुख्य माहिती आयुक्त व माहिती आयुक्त यांना राष्ट्रपतीच्या आदेशावरुन सर्वोच्च न्यायालयाच्या चौकशीनंतर पदावरुन काढण्यात येईल. तसेच कर्तव्याबाहेर वेतनी रोजगार प्राप्त करीत असेल किंवा मानसिक किंवा शारीरिक विकलांग झाला असेल असे राष्ट्रपतीला वाटल्यास त्यांना राष्ट्रपतीच्या आदेशावरुन पदच्युत करता येते.

## ५.११ राज्य माहिती आयोग :

राज्य मुख्य माहिती आयोगामध्ये राज्य मुख्य माहिती आयुक्त व दहापेक्षा अधिक नसतील इतके राज्य माहिती आयुक्त असतील. राज्यपाल हे मुख्यमंत्री, विधानसभेतील विरोधी पक्षनेता आदींच्या समितीच्या शिफारशीवरुन राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांची नियूक्ती करतील.

### ५.११.१ पात्रता :

राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त हे विज्ञान, कायदा, समाजसेवा व्यवस्थापन, पत्रकरिता इ. क्षेत्रांमधील तज्ज्ञ व अनुभवी असावेत. संसदेचे वा राज्य विधिमंडळाचे सभासद नसावेत. लाभाचे पद धारण करु नये. राजकीय पदाशी संबंधित नसावे.

### ५.११.२ पदच्युती :

गैरवर्तणुकीच्या किंवा अकार्यक्षमतेच्या कारणावरुन राज्य मुख्य माहिती आयुक्त किंवा राज्य माहिती आयुक्तास राज्यपाल सर्वोच्च न्यायालयाच्या चौकशीनंतर आदेशाव्दारे पदावरुन काढून टाकू शकेल. नादार झाला असेल, नैतिक अध:पतन झाल्यास, मानसिक किंवा शारीरिक विकलांगतेच्या कारणावरुन राज्यपाल राज्य मुख्य माहिती आयुक्तास पदावरुन काढून टाकू शकेल.

### ५.११.३ माहिती आयोगाचे अधिकार व कार्ये :

१. आयोगाचे कामकाजाचे अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन करणे.

२. नागरिकांकडून कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्याबद्दल व इतर कारणावरुन तक्रारी स्वीकारणे व त्यांची चौकशी करणे.

३. चौकशी करण्यास सयुक्तिक कारण वाटल्यास आयोग चौकशी करु शकेल.

४. कोणत्याही प्रकरणाची चौकशी करतेवेळी कोणत्याही व्यक्तीविरुध्द समन्स काढणे, दस्ताऐवजाचा शोध घेणे, शपथपत्रावर पुरावा घेणे, मंत्रालयाकडून, कार्यालयाकडून शासकीय अभिलेखाच्या प्रती मागविणे, साक्षीदारांची वा दस्तऐवजांची तपासणी करणे.

५. शासकीय प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही अभिलेखाची तपासणी करणे.

### ५.११.४ अपील :

माहिती मिळविण्याचा अर्ज केल्यापासून ३० दिवसांच्या आत माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर आहे. ३० दिवसांत माहिती न मिळाल्यास किंवा माहिती अधिकाऱ्याने माहिती नाकारल्यास अर्जदार पुढील ३० दिवसांत अपील अधिकाऱ्यांकडे अपील करु शकतो. अपील केल्यानंतर जास्तीत जास्त ४५ दिवसांत अपील अधिकाऱ्याने निकाल दिला पाहिजे. जर या वेळेत निकाल न मिळाल्यास किंवा दिलेल्या निकालामुळे तुमचे समाधान न झाल्यास, ९० दिवसात राज्य जन माहिती आयुक्ताकडे दुसरे अपील केले जाऊ शकते.

एखाद्या व्यक्तीच्या जावित वा स्वातंत्र्यासंबंधातील माहिती मागवलेली असेल तर अर्ज मिळाल्यापासून ४८ तासांत ती माहिती देण्याचे बंधन संबंधित अधिकाऱ्यावर आहे.

### ५.११.५ दंडनीय तरतूद :

माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्याचे अकारण नाकारल्यास, जाणूनबुजून अर्धवट अथवा दिशाभूल करणारी माहिती दिल्यास, माहिती नष्ट केल्यास, माहिती मिळण्यास कोणत्याही प्रकारे अडथळा आणल्यास, माहिती आयुक्त हे माहिती अधिकाऱ्यास रु. २५०/- प्रति दिवस प्रमाणे जास्तीत जास्त रु. २५,०००/- पर्यंत दंड ठोठावू शकतात तसेच अशाप्रकारे एखाद्या माहिती अधिकाऱ्याकडून वारंवार माहिती देण्यास कसूर होत असल्यास त्याच्या विरुध्द खातेनिहाय कार्यवाहीची शिफारस करु शकतात.[१]

### ५.११.६ समारोप :

अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मुळे जनतेच्या हातात शस्त्र प्राप्त झ ालेले आहे. त्याचा उपयोग सकारात्मक पध्दतीने व्हावा, ही अपेक्षा आहे. सदरील कायदा सार्वजनिक प्राधिकरणास लागू आहे; परंतु या कायद्याच्या कार्यक्षेत्रात खासगी क्षेत्र येत नाही. खासगी क्षेत्रातील माहिती मात्र सामान्य जनतेस प्राप्त होत नाही. तसेच या कायद्यामुळे कर्मचाऱ्यावर कामाचा ताण वाढून इतर कामाकडे दुर्लक्ष होऊ शकते. सार्वजनिक प्राधिकरणामध्ये

त्यासाठी कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करणे आवश्यक आहे; तरीही या अधिनियमामुळे सामान्य जनतेच्या हातात प्रभावी आयुध सापडले आहे. तसेच भ्रष्टाचारास आळा घालण्यासाठी, सरकारी कामकाजात पारदर्शकता येण्यासाठी, अभिव्यक्ती स्वातंत्र्याला बळकटी आणण्यासाठी हा कायदा निश्चित हातभार लावेल अशी अपेक्षा आपण करु शकतो.

## ५.१२ ग्रामसभा :

ग्रामसभा ही लोकशाहीतील सर्वोच्च व्यवस्था आहे. २६ जानेवारी १९५० रोजी आपण देशात पहिला प्रजासत्ताक दिन साजरा केला. त्याच दिवशी या देशात प्रजेची सत्ता आली. आम्ही सर्व भारतीय नागरिक - प्रजासत्ताक आले, गणराज्य आले, प्रजातंत्र आले असे म्हणायला लागलो.

मात्र प्रजासत्ताक दिन साजरा करीत साठ वर्षे निघून गेली आहेत. अद्यापही नागरिकांना गणराज्याचा, लोकशाहीचा, प्रजातंत्राचा, स्वातंत्र्याचा खऱ्या अर्थाने अनुभव होत, नाहीये हे नाकारता येत नाही.

दर वर्षी २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिन प्रत्येक गावातील शाळेच्या आवारात साजरा होतो; मात्र सत्ता मुंबई - दिल्लीमध्ये आहे. जोपर्यंत प्रजेच्या हातात सत्ता येत नाही, तोपर्यंत प्रजासत्तकाचा खऱ्या अर्थाने नागरिकांना अनुभव घेता येणार नाही.

ग्रामसभा ही सार्वभौम आहे, स्वयंभू आहे. १८ वर्षे वय झाले, मतदान करण्याचा अधिकार मिळाला. तो प्रत्येक नागरिक ग्रामसभेचा आपोआप सदस्य होतो. एकदा सदस्य झाल्यानंतर तो

मरेपर्यंत सदस्य राहतो. ग्रामसभेला निवडणूक नाही. गावातील प्रत्येक मतदार नागरिक हा ग्रामसभेचा सदस्य आहे.

ग्रामसभा सदस्यांनी (मतदारांनी) राज्य आणि केंद्राचा कारभार करण्यासाठी आमदार, खासदारांना आपले विश्वस्त, लोकसेवक म्हणून पाठविलेले आहे. म्हणून घटनेप्रमाणे राज्यात विधानसभा व केंद्रात लोकसभा अस्तित्वात आल्या. ज्याअर्थी मतदारांनी त्यांना लोकसेवक म्हणून पाठविले आहे त्या अर्थी त्यांचा दर्जा मतदारांपेक्षा दुय्यम आहे. लोकशाहीमध्ये मतदारांचे स्थान हे सर्वोच्च स्थान आहे, कारण मतदार या देशाचा राजा आहे.

म्हणुनच निवडणूकीच्या वेळी प्रत्येक उमदेवार मतदारांकडे हात जोडून विनंती करीत असतो, की मतदार राजा, सेवा करण्याची संधी द्या. मतदार राजा हा खऱ्या अर्थाने राजा राहण्यासाठी ग्रामसभेला अधिकार देणे आवश्यक आहे. आज तसे अधिकार नसल्याने फक्त निवडणूक काळापुरता मतदार राजा होतो; मात्र त्यानंतर निवडून आलेले राजे होतात. आणि मतदार गुलाम होतो. हे चित्र बदलण्यासाठी मतदारांच्या हातात सत्ता असणे आवश्यक आहे. महात्मा गांधींनी म्हटले होते, की केंद्रित असणारी सत्ता विकेंद्रित होऊन मतदारांच्या हाती येणार नाही तोपर्यंत खरी लोकशाही येणार नाही.

ज्याअर्थी ग्रामसभा सदस्य असणाऱ्या मतदारांनी आमदार, खासदारांना निवडून पाठविले, त्या अर्थी ग्रामसभाच राज्यासाठी विधानसभा आणि केंद्रासाठी लोकसभा झालेली आहे. म्हणजेच ग्रामसभा ही विधानसभा आणि लोकसभेची जननी आहे असे म्हटले तर वावगे ठरु नये.

विधानसभा, लोकसभा प्रत्येक पाच वर्षांनी बदलत असतात. त्यांना बदलण्याचे काम मतदार करतात; मात्र ग्रामसभा ही कधीच बदलत नाही. घटनेने ग्रामसभेला सार्वभौम व स्वयंभू ठेवलेले आहे.

आपण मतदारांनी आमदार, खासदारांना निवडून पाठविल्यामुळे व ते जनतेचे सेवक असल्यामुळे "मुंबई, दिली में हमारी सरकार | हमारे गाँव में हम ही सरकार ||" असे म्हणू शकणारी ग्रामसभा सर्वोच्च आहे.

ग्रामसभेला जादा अधिकार देण्यात यावेत अशी अनेक वर्षे जनतेची मागणी होती. भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाच्या माध्यमातून २ ऑगस्ट १९९९ पासून १३० ते १४० वेळा पत्रव्यवहार करुन दिनांक १५ मे २००६ पर्यंत ६ वेळा आंदोलने अण्णा हजारे यांनी केली म्हणून मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी ८ जाने. २००३, १ ऑगस्ट २००३ आणि २१ डिसेंबर २००६ रोजी कायदे करण्यात आलेले आहेत. त्याबरोबरच भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाने वेळोवेळी केलेल्या आंदोलनामुळे महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेला जादा अधिकार देण्याबाबत कायदे केले आहेत. यावर अभ्यास करुन लोकशिक्षण, लोकजागृती होणे आवश्यक आहे. अन्यथा कायदे कितीही चांगले असले तरी नागरिकांना त्याचा उपयोग होणार नाही, असे अण्णा हजारे म्हणतात.[१०]

## ५.१३ ग्रामसभा आणि ग्रामसभेच्या कायद्याची कार्यपध्दती याविषयी अण्णा हजारे यांच्या अपेक्षा :

विकासकामामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन ती सत्ता मतदाराच्या हातात जात नाही तोपर्यंत, अपेक्षित लोकसहभाग मिळू शकणार नाही. त्याप्रमाणे विकासकामामध्ये, आर्थिक व्यवहारामध्ये पारदर्शकता येणार नाही, तो पर्यंत नागरिकांचा विश्वास संपादन होणार नाही असे अण्णा हजारे यांचे मत होते.

१९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाले; पण स्वातंत्र्य कुणाला मिळाले हा प्रश्न आहे. इंग्रजांच्या वेळी जी माणसं गुलामगिरीचे जीवन जगत होती त्यांमध्ये विशेष फरक पडल्याचे जाणवत नाही. तोच भ्रष्टाचार, गुंडगिरी, दडपशाही, हुकूमशाही आजही चालूच आहे. फक्त गोरे इंग्रज गेले आणि काळे आले यापेक्षा वेगळे काय? असा प्रश्न अण्णा हजारे उपस्थित करतात.

इंग्रजांनी आपसात फूट पाडा आणि राज्य करा ही नीती वापरली होती. त्या आधारानेच त्यांनी १५० वर्षे राज्य केले. आजही तीच नीती खेड्या पाड्यांमध्ये पाहायला मिळत आहे. असे गाव मिळणार नाही, ज्या गावात गट - तट नाही, आता तर गावातच नाही तर कुटुंबातील दोन भावांमध्येही गट - तट निर्माण झालेले पाहायला मिळतात. अशा या गट - तटामुळे खेड्यामध्ये भांडण, तंटे, वैमनस्य, मतभेद वाढले आणि गावच्या विकासकामांना खीळ बसली असे अण्णा हजारे म्हणतात.

७३ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन खेड्यांच्या विकासाला गती मिळावी, विकासकामांना गती मिळून भ्रष्टाचाराला आळा बसावा, विकासकामांचा दर्जा सुधारावा यासाठी अण्णांनी अनेक वर्षे प्रयत्न केले. त्याचाच एक भाग म्हणून ग्रामसभेला मजबुती प्राप्त करुन देऊन भ्रष्टाचारमुक्त लोकशाही भारतातील प्रत्येक कुटुंबाच्या घरात घेऊन जाण्यासाठी अण्णा हजारे यांनी ग्रामसभेचा कायदा केला. हा कायदा निर्मितीमागे अण्णा हजारे यांच्या काय अपेक्षा आहेत पुढील प्रमाणे.

### ५.१३.१ ग्रामसभा :

गावात विकासकामासाठी आलेला निधी हिशेब ठेवण्यासाठी ग्रामपंचायतीच्या खात्यामध्ये असावा, मात्र ग्रामपंचायतीने तो निधी खर्च करताना ग्रामसभेची मान्यता घेणे बंधनकारक आहे. गावाची ग्रामसभा ही गावाची संसद आहे व ग्रामपंचायत हे गावाचे मंत्रिमंडळ आहे. गावाच्या मंत्रिमंडळाने गावाच्या ग्रामसभेची मान्यता घेऊनच आलेला निधी खर्च करायला हवा. एखाद्या ग्रामपंचायतीने ग्रामसभेची मान्यता न घेता आलेला निधी परस्पर खर्च केला तर ग्रामसभा सरपंच - उपसरपंचाला बरखास्त करील व ग्रामसेवकावर शिस्तभंगाची कार्यवाही होईल असे अण्णा हजारे यांचे मत होते.

**५.१३.२ ग्रामसभेच्या कायद्याची कार्यपध्दती :**

एखाद्या ग्रामपंचायतीने विकासकामांचा निधी ग्रामसभेची मान्यता न घेता खर्च केला, तर गावातील मतदारांच्या २०% मतदार आपल्या सह्यानिशी जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे चौकशी व्हावी यासाठी अर्ज करतील. मुख्य कार्यकारी अधिकारी त्या ग्रामपंचायतीची चौकशी करतील. चौकशीमध्ये जर स्पष्ट झाले, की ग्रामसभेची मान्यता न घेता ग्रामपंचायतीने आलेला निधी परस्पर खर्च केला, तर मुख्य कार्यकारी अधिकारी आपला अहवाल विभागीय आयुक्तांकडे सादर करतील. आयुक्तांची खात्री पटली की, ग्रामपंचायतीने निधी परस्पर खर्च केला आहे तर आयुक्त सरपंच, उपसरपंचाना बरखास्त करतील आणि ग्रामसेवकावर शिस्तभंगाची कार्यवाही होईल. ही कार्यवाही कार्यकारी अधिकारी यांनी एक महिन्यात करावयाची असून आयुक्तांनाही एक महिन्यात निर्णय घ्यावा लागेल. यदाकदाचित एखाद्या सरपंच, उपसरपंचाला आपल्यावर अन्याय झाला असे वाटत असेल तर त्यांना सरकारकडे दाद मागता येईल. सरकारचा निर्णय अंतिम राहील. अशा प्रकारचा कायदा करुन त्याची अंमलबजावणी व्हावी असे अण्णा हजारे यांचे मत होते. कालांतराने तसा कायदा सरकारशी संघर्ष करुन अण्णा हजारे यांनी पारित करुन घेतला.[११]

## ५.१४ मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम :

१. महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, दि. ८ जानेवारी २००३.

२. महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, दि. १ ऑगस्ट २००३.

३. महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, दि. २१ डिसेंबर २००६.

### ५.१४. १ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, दिनांक ८ जानेवारी २००३ :

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ हा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अस्तित्वात आलेला अधिनियम होय. या अधिनियमास मुंबई ग्रामपंचायत (तिसरी सुधारणा) अधिनियम २००२ असे म्हणावे. हा अधिनियम १६ ऑक्टोबर २००२ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम-१९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अस्तित्वात आलेला अधिनियम असल्याने सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ मधे अनेक महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ६ मधील (क) गट कलम (१) मध्ये चार सभा या मजकुराऐवजी सहा सभा हा मजुकर सन २००३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्याचबरोबर या सन २००३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ मध्ये ग्रामसभेच्या दोन सभांदरम्यान तीन महिन्यांपेक्षा जास्त

कालावधी नसेल असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचबरोबर सरपंचाने किंवा यथास्थिती उपसरपंचाने विनिर्दिष्ट कालावधीत कोणतीही अशी सभा बोलावण्यात कसूर केल्यास, सचिव सभा बोलावील आणि अशी सभा ही सरपंचाच्या किंवा यशास्थिती, उपसरपंचाच्या सहमतीने बोलावण्यात आली आहे असे गृहीत धरण्यात येईल असे देखील या सुधारित अधिनियमात स्पष्ट करण्यात आले आहे.

त्याचबरोबर या सुधारित अधिनियमात पंचायतीच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या ग्रामसभेच्या पहिल्या सभेत आणि त्यानंतर दरवर्षीच्या पहिल्या सभेमध्ये सरपंचाच्या अनुपस्थितीत उपसरपंच अध्यक्षस्थानी राहील आणि ग्रामसभेच्या त्या वर्षातील सर्व सभांमध्ये, ग्रामसभेच्या सभेमध्ये उपस्थित असलेल्या व्यक्तीमधून निवडलेली एखादी व्यक्ती अध्यक्षस्थानी राहील.

या अधिनियमान्वये ग्रामसभेच्या महिला सदस्यांची सभा ही त्या दिवशी आयोजित केलेल्या ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेपूर्वी घेण्यात येईल. त्याचबरोबर गावामध्ये काम करत असलेल्या शासकीय, निमशासकीय व पंचायतीच्या कर्मचाऱ्यावर व कर्मचाऱ्याच्या कार्यालयातील रोजच्या उपस्थितीवर ही ग्रामसभेचे शिस्तीविषयक नियंत्रण असेल तसेच अशा कर्मचाऱ्यांचे वार्षिक मुल्यमापन ग्रामसभेकडून त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले जाईल.

ग्रामसभा ही अशा कोणत्याही कर्मचाऱ्याकडून घडलेली कोणतीही नियमबाह्य गोष्ट असल्यास त्याबाबत संबंधित गटविकास अधिकाऱ्याला अहवाल देईल. गटविकास अधिकारी असा अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत त्यावर विचार

करील. अशी प्रकरणे व त्यावर केलेली कार्यवाही याचा पंचायत समितीच्या नियमित सभांमध्ये आढावा घेण्यात येईल. गटविकास अधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत असे अहवाल निकालात काढण्यास कसूर केली तर, उक्त कालावधी संपल्यानंतर ते अहवाल निकालात काढण्यासाठी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे हस्तांतरित होतील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल. जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी त्याच्याकडे अशारीतीने हस्तांतरित झालेल्या अहवालावर, ते मिळण्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत, निर्णय घेईल.

ग्रामसभा, राज्यशासनाच्या किंवा यथास्थिती, केंद्रसरकारच्या व्यक्तिगत, लाभधारक योजनांकरिता लाभधारकाची निवड करील.

ग्रामसभा सर्वसाधारणपणे, तिच्या पुढील सभेचा दिनांक, वेळ व ठिकाण अगोदरच्या सभेत निश्चित करील. ग्रामसभेस सूट दिलेली नसेल तर गावात काम करणारे शासकीय, निमशासकीय आणि पंचायतीचे सर्व कर्मचारी ग्रामसभेच्या सभांना हजर राहतील. ग्रामसभेच्या प्रत्येक सभेचे कार्यवृत्त, ग्रामपंचायतीचा संबंधित सचिव तयार करील व ठेवील आणि त्याच्या अनुपस्थितीत, सभेचे कार्यवृत्त सरपंच निर्देश देईल त्याप्रमाणे, गावात काम करणारा शिक्षक, तलाठी किंवा अंगणवाडी सेविका यांसारखा कोणताही शासकीय, निम-शासकीय किंवा पंचायतीचा कर्मचारी तयार करील आणि ते अभिलेखासाठी पंचायतीकडे सुपूर्द केले जाईल.

त्याचबरोबर या अधिनियमामध्ये पंचायतीकडून राबविण्यात येतील अशा सामाजिक किंवा आर्थिक विकासाच्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांच्या अंमलबजावणीचे काम त्या पंचायतीने हाती घेण्यापूर्वी मान्यता देणे, त्याचबरोबर विकासयोजनांवर कोणताही खर्च करण्याची पंचायतीला परवानगी देणे, तसेच अशा पंचायतीच्या अधिकारितेत येणारी कोणतीही जमीन शासकीय प्रयोजनार्थ संबंधित भूमी संपादन प्राधिकरणाव्दारे संपादित करण्याच्या कोणत्याही प्रस्तावसंबंधात पंचायतीकडून कोणताही निर्णय घेण्यात येण्यापूर्वी पंचायतीला आपली मते कळविणे हे वरील तीन ग्रामसभेचे अधिकार व कर्तव्य समाविष्ट करण्यात आले आहेत.

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ नुसार, पंचायत, विकास योजनांवर कोणताही खर्च करण्यासाठी ग्रामसभेची परवानगी मिळवील. त्याचबरोबर त्या पंचायतीच्या अधिकारितेत येणारी कोणतीही जमीन, शासकीय प्रयोजनार्थ, संबंधित भूमी संपादन प्राधिकरणाकडून संपादित केली जाण्यापूर्वी ते प्राधिकरण पंचायतीशी विचार विमर्श करील.

परंतु प्रत्येक पंचायत संबंधित भूमी संपादन प्राधिकरणाला आपली मते कळविण्यापूर्वी पंचायत ग्रामसभेची मते प्राप्त करील आणि विचारात घेईल.

अशा प्रकारे वरील काही बाबींचा समावेश असणारा सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, ८ जानेवारी २००३ हा पारित झाला.[१२]

## ५.१४.२ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ :

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ हा मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १ ऑगस्ट २००३ रोजी प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम होय. २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ हा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अस्तित्वात आलेला अधिनियम होय.

या अधिनियमास मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) अधिनियम २००३ असे म्हणावे, या अधिनियमाचे कलम ४ व ६ दिनांक १४ जानेवारी २००३ रोजी अमलात आले असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाचे कलम २, ३ व ५ दिनांक २ जुलै २००३ रोजी अमलात आले असल्याचे मानण्यात येईल अशी या अधिनियमात तरतूद करण्यात आली आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ याच्या कलम ३ मध्ये पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल अशी तरतूद आहे. त्यात लाभार्थी स्तर उपसमिती याचा अर्थ ग्रामपंचायतीमधील वसतिस्थान (प्रभाग, वस्ती, वाडी, तांडा, पाडा किंवा कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे असे स्वतंत्र वसतिस्थान) किंवा त्याचा भाग याची भौगोलिक भू-जलशास्त्रीय, तंत्रशास्त्रीय, अर्थशास्त्रीय, सामाजिक आणि लोकसंख्या शास्त्रीय स्थिती विचारात घेऊन एखादा, विशिष्ट कार्यक्रम, योजना, कार्य किंवा उपयुक्तता यांच्याकरिता कलम ४९-क अन्वये तयार करण्यात आलेली उप समिती असा आहे. कलम ३ (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल : "ग्रामविकास समिती"

याचा अर्थ, कलम ४९ अन्वये तयार करण्यात आलेला समिती असा आहे, येईल असा - उल्लेख करण्यात आलेला आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ४९ ऐवजी या सन २००३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ मध्ये पुढील कलमे समाविष्ट करण्यात आली आहेत.

१. ग्रामसभा, पंचायतीशी विचारविनिमय करुन, पंचायतीचे सदस्य, ग्रामपंचायत क्षेत्रात काम करणाऱ्या समूहाधारित संघटनांचे प्रतिनिधी, पंचायती, जिल्हा परिषद, राज्यशासन आणि मतदार यांचे ग्रामस्तरावरील कार्यकर्ते यांच्यामधून कोणत्याही नावाने संबोधण्यात येतील अशा एक किंवा अधिक ग्रामविकास समित्या तयार करील.

२. या नवीन ग्रामविकास समित्यांची मुदत पंचायतीच्या मुदतीएवढी असेल.

३. अशा ग्रामविकास समित्या, अनुसूची एकमध्ये नमूद केलेले विषय व कार्ये याबाबत पंचायतीशी विचार-विनिमय करुन, ग्रामसभेकडून प्रत्यायोजित करण्यात येतील किंवा नेमून देण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील आणि पंचायतीची अशी कर्तव्ये व कामे पार पाडतील आणि ग्रामसभा, जिल्हा परिषद, शासन किंवा इतर कोणतेही सक्षम प्राधिकरण यांच्याकडून पंचायतीकडे, वेळोवेळी सोपविण्यात येतील अशी पंचायतीशी संबंधित किंवा तिच्याशी संलग्न असलेली इतर कामे व कार्ये पार पाडतील. ग्रामसभेला पंचायतीचे, सर्वसाधारण पर्यवेक्षण आणि नियंत्रण यांना अधीन राहून अशा समित्यांच्या कार्यपध्दतीचे नियमन करता येईल.

४. ग्रामविकास समितीतील सदस्यांची एकूण संख्या, बारापेक्षा कमी नसेल आणि चोवीसपेक्षा जास्त नसेल; परंतु ग्रामविकास समितीच्या सदस्यांपैकी एक तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतके सदस्य पंचायतीच्या सदस्यांमधील असतील. ग्रामविकास समितीच्या सदस्यांपैकी एकव्दितीयांशापेक्षा कमी नसतील इतके सदस्य महिला असतील आणि त्याचबरोबर त्याबाबतीत शासनाकडून विनिर्दिष्ट संख्येतील सदस्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील असतील; परंतु आणखी असे, की जेंव्हा ग्रामविकास समिती ही केवळ महिलांच्या किंवा दुर्बल वर्गाच्या हितासाठीचा एखादा कृतिकार्यक्रम योजना किंवा उपयुक्तता यांच्या प्रयोजनासाठी गठित करण्यात आली असेल तेव्हा अशा समितीमधील महिला सदस्यांचे किंवा यथास्थिती, दुर्बल, वर्ग सदस्यांचे संख्याबळ हे समिती सदस्यांच्या एकूण संख्येच्या तीन - चतुर्थांशापेक्षा कमी असणार नाही.

ग्रामसभा, ग्रामविकास समितीमध्ये ग्राम महिला मंडळ किंवा या प्रयोजनासाठी विशेषरीत्या बोलाविण्यात आलेली महिला मतदारांची ग्रामसभा यांच्याकडून शिफारस करण्यात येईल अशा महिला सदस्यांचे सामान्यपणे नामनिर्देशन करील. पुरेसे कारण असले, तर ते कामकाजामध्ये नमूद करुन मगच ग्रामसभेला अशी कोणतीही शिफारस नाकारता येईल.

ग्रामसभेला तिच्या स्वेच्छानिर्णयानुसार महिला मंडळे, युथ क्लब इत्यादीसारख्या कोणत्याही ग्रामस्तरावरील संस्थांच्या सदस्यांना पसंतीक्रम देता येईल.

ग्रामसभेला, शिक्षक, तलाठी, अंगणवाडी सेविका, गावातील पाणीवाले, ग्रामीण आरोग्यसेवक यासारखे गामीण भागात काम करणारे शासनाचे, निम-शासनाचे, जिल्हा परिषदेचे, ग्रामस्तरावरील कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी यांनादेखील, कोणत्याही बाबीवर साहाय्य करण्याचा किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी ग्रामविकास समितीच्या सभेला किंवा सभांना हजर राहण्यासाठी विशेष आमंत्रित म्हणून बोलावता येईल अशा आमंत्रित केलेल्या अधिकाऱ्याला कामकाजामध्ये भाग घेता येईल; परंतु त्याला मतदानाचा अधिकार असणार नाही.

गठित केलेली ग्रामविकास समिती ही पंचायतीची समिती असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पंचायतीच्या सर्वंकष पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली असेल. पंचायतीची प्रशासकीय यंत्रणा जशी पंचायतीला साहाय्य करते तशीच ती अशा समितीला साहाय्य करील अशी तरतूद करण्यात आली आहे.

ग्रामविकास समितीच्या लेख्यांचे वार्षिक विवरण व कामकाज, दैनंदिन सोयीसाठी स्वतंत्रपणे ठेवण्यात येईल व जतन करण्यात येईल, मात्र पंचायत अभिलेख्यांचा, लेख्यांचा व कामकाजाचा तो अविभाज्य भाग असेल आणि पंचायतीमार्फत, पंचायतीच्या वार्षिक अर्थसंकल्पाला मान्यता देण्याच्या आणि वार्षिक लेख्यांना मंजुरी देण्याच्या प्रयोजनासाठी विशेषरीत्या बोलाविण्यात आलेल्या ग्रामसभेच्या सभेमध्ये तो सादर करण्यात येईल.

ग्रामविकास समितीचे अधिकार, कर्तव्ये आणि कार्ये काढून घेण्याच्या आणि ग्रामपंचायतीला, त्यांची कार्ये परत घेऊ देण्याच्या प्रयोजनासाठी खास बोलाविलेल्या बैठकीमध्ये

उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन - तृतीयांशापेक्षा कमी नाही इतक्या बहुमताने, असाधारण परिस्थितीमध्ये, अशी परिस्थिती नमूद करुन आणि तिला मान्यता देऊन ग्रामसभेव्दारे तसे ठरविले असल्याखेरिज, सामान्यतः पंचायत, ग्रामसभेकडून ग्रामविकास समितीकडे सोपविण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करणार नाही आणि तिची कर्तव्ये आणि कार्ये पार पाडणार नाही.

ग्रामविकास समितीच्या एकदा नियुक्त केलेल्या सदस्यास, पुढील बाबी वगळता, पोट कलम (२) मध्ये तरतूद केलेला कालावधी समाप्त होण्यापूर्वी, पदावरुन दूर कराण्यात येणार नाही किंवा परत बोलावले जाणार नाही.

अ) त्या प्रयोजनासाठी येथोचितरीत्या बोलाविलेल्या बैठकीमध्ये ग्रामसभेने तसा स्पष्ट निर्णय संमत केला असल्याखेरीज किंवा

ब) अशा सदस्याला कलम १४ मध्ये पंचायत सदस्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणतीही निरर्हता लागू असल्याखेरीज पदावरुन दूर करता येणार नाही किंवा परत बोलावता येणार नाही.

ग्रामविकास समितीच्या सदस्याचा मृत्यू, त्याचा राजीनामा, त्याला पदावरुन काढून टाकणे किंवा परत बोलावणे किंवा अन्य प्रकारच्या सदस्याची निरर्हता यामुळे रिक्त झालेले कोणतेही पद पोट कलम (१), (२) आणि (४) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे भरण्यात येईल.

नवीन पंचायत गठित झाल्यावर पंचेचाळीस दिवसांच्या आत ग्रामविकास समिती पुनर्गठित करण्यात येईल.

परंतु, आधीच्या समितीच्या सदस्यांना, अन्यथा पात्र असतील तर, नवीन समितीवर पुनर्नियुक्तीसाठी कोणतीही आडकाठी करण्यात येणार नाही.

या अधिनियमातील कलम ४९ च्या पोट कलम (१) अन्वये गठित करण्यात आलेल्या ग्रामविकास समितीला, पंचायतीशी विचारविनिमय करुन आणि ग्रामसभेच्या पूर्वमान्यतेने आणि इष्ट वाटल्यास, पंचायत क्षेत्रातील वस्तीची भौगोलिक, भू-जलशास्त्रीय, तंत्रशास्त्रविषयक, आर्थिक, सामाजिक व लोकसंख्याविषयक स्थिती विचारात घेऊन, केवळ त्या वस्तीसाठीच असलेल्या विद्यमान किंवा प्रस्तावित कृती कार्यक्रम, योजना अथवा उपयोगिता यांच्या लाभार्थी मतदारांच्या निवडणुकीकरिता म्हणून घेण्यात येणाऱ्या बैठकीमध्ये, ज्यात प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला एक मत असेल, एक लाभार्थी स्तर उप - समिती गठित करता येईल.

अशा एक लाभार्थी स्तर उप-समितीची मुदत पंचायतीच्या मुदतीएवढी असेल, ग्रामविकास समितीला, ग्रामपंचायतीच्या मान्यतेने, विनिर्दिष्ट कृती कार्यक्रम योजना किंवा उपयोगितेच्या संबंधातील तिचे अधिकार, प्राधिकार, कार्ये आणि कर्तव्ये लाभार्थी स्तर उपसमितीकडे सोपवता येतील. या लाभार्थी स्तर उप-समितीतील सदस्यांची एकूण संख्या बारा सदस्यांहून अधिक असणार नाही :

परंतु - लाभार्थी स्तर उप-समिती त्यासाठी गठित केली असेल अशा योजनेचे, कृती कार्यक्रमाचे किंवा उपयोगितेचे जे लाभार्थी आहेत असे पंचायत सदस्य हे अशा लाभार्थी स्तर उपसमितीचे सदस्य असतील.

समितीच्या सदस्यापैकी एक व्दितीयांशापैकी कमी नसतील इतके सदस्य महिला असतील आणि या बाबतीत शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल तेवढ्या प्रमाणात उक्त समितीवरील पदे राखून ठेवण्यात येतील व ती दुर्बल घटकातील सदस्यांमधून भरण्यात येतील.

लाभार्थी स्तर उप-समिती, ती ज्यासाठी गठित करण्यात आली असेल असे कृती कार्यक्रम, योजना किंवा उपयोगिता यांच्या संबंधातील अधिकारांचा वापर करील आणि त्याच्याशी संबंधित कर्तव्ये आणि कार्ये पार पाडील आणि ती संबंधित ग्रामविकास समितीचे सर्वंकष अधीक्षण, नियंत्रण आणि मार्गदर्शन यांच्या आधीन असेल.

एकदा नियुक्त केलेल्या लाभार्थी स्तर उप-समितीच्या सदस्यांना खालील बाबी वगळता, त्यांचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी पदावरुन दूर करता येणार नाही किंवा परत बोलावले जाणार नाही.

त्या प्रयोजनासाठी यथोचितरीत्या बोलाविलेल्या बैठकीमध्ये ग्रामसभेने किंवा यथास्थिती, कृती-कार्यक्रम, योजना असल्याखेरिज किंवा अशा सदस्याला पंचायत सदस्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणतीही निरर्हता लागू असल्याखेरिज, त्याचबरोबर लाभार्थी स्तर उप-समिती सदस्याचा मृत्यू, त्याचा राजीनामा, त्याला पदावरुन काढून टाकणे वा परत बोलावणे किंवा

अन्यप्रकारची सदस्याची निरर्हता यामुळे रिक्त झालेले कोणतेही पद पोट कलम (१), (२) आणि (४) या खाली तरतूद करण्यात आल्याप्रमाणे भरण्यात येईल.

नवीन पंचायत गठित झाल्यावर ती गठित झाल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत लाभार्थी स्तर उपसमिती पुनर्गठित करण्यात येईल.

परंतु आधीच्या समिती सदस्यांना अन्यथा ते पात्र असतील, तर नवीन समितीवर पुनर्नियुक्तीसाठी कोणतीही आडकाठी करता येणार नाही.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १६० मधील पोट कलम (१) मध्ये खंड (क) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल.

“परंतु, जेथे गावाच्या हद्दीमध्ये समाविष्ट असलेले कोणतेही स्थानिक क्षेत्र, अशा गावाच्या स्थानिक क्षेत्रातून वगळलेले असेल आणि अशा विद्यमान गावाच्या लोकसंख्येच्या दहा टक्क्याहून अधिक लोकसंख्या, कोणत्याही प्रकारे बाधित न होता किंवा नव्याने घोषित केलेल्या गावामध्ये स्थलांतरित न होता ते केवळ प्रकल्पबाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठीचे वेगळे गाव असल्याचे घोषित केले असेल तर अशा प्रकरणात, या खंडामध्ये किंवा त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा प्रकारे स्थानिक क्षेत्र वगळणे आणि त्याच्या परिणामी विद्यमान गावाच्या हद्दीत होणारा बदल हा कलम (४) चे पोटकलम (२) आणि कलम १६० चे पोट कलम (१) यामध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे अशा गावाच्या हद्दीतील बदल असल्याचे मानण्यात येणार नाही आणि या खंडात तरतूद केल्याप्रमाणे अशा विद्यमान बाधित

गावाची विद्यमान पंचायत विसर्जित झाल्याचे मानण्यात येणार नाही आणि पंचायतीचे सर्व सदस्य, त्यांच्या मुदतीच्या उर्वरित कालावधीसाठी अशा पंचायतीचे सदस्य असणे सुरु राहिल."

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १७६ च्या पोट - कलम (२) च्या खंड (दहा-क) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ४ अन्वये काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००३ चे कलम ४ हे अमलात आल्याच्या दिनांकाला किंवा त्यानंतर मुख्य अधिनियमाखाली (मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८) काढण्यात आलेला कोणताही आदेश, निर्देश किंवा सूचना कधीही काढण्यात आलेली नव्हती असे मानण्यात येईल आणि अशी अधिसूचना, आदेश, निर्देश किंवा यथास्थिती, सूचना काढल्याच्या परिणामी ज्याच्या सीमांमध्ये फेरफार करण्यात आले आहेत अशी विद्यमान ग्रामपंचायत विसर्जित होणार नाही किंवा तिचे कधीही विसर्जन झाले नव्हते असे मानण्यात येईल आणि अशा पंचायतीच्या कोणत्याही सदस्याने, त्याचे पद कधीही सोडले नव्हते असे मानण्यात येईल आणि त्यानुसार अशा पंचायतीचे सर्व सदस्य त्यांची मुदत पूर्ण होईपर्यंत सदस्य म्हणून पदावर राहतील आणि ते सतत पदावर होते असे मानण्यात येईल अशी तरतूद या अधिनियमात करण्यात आली आहे.

अशा विद्यमान पंचायतीच्या सीमांमध्ये फेरफार करणारी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ४ खालील अधिसूचना मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) अधिनियम २००३

चा कलम ४ हे अमलात यायच्या दिनांकाला किंवा त्यापूर्वी, आधीच काढण्यात आलेली होती, एवढ्याच केवळ कारणावरुन, कोणताही दावा, अर्ज किंवा कोणतीही कायदेशीर कार्यवाही, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी यांच्यासमोर दाखल करता येणार नाही किंवा चालवता येणार नाही.

या अधिनियमाव्दारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणताना किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही अडचण उदभवल्यास, राज्य शासनाला प्रसंग उदभवेल त्याप्रमाणे अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाव्दारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही कृती आदेशाव्दारे करता येईल.

परंतु या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर कोणताही असा आदेश काढता येणार नाही.

या अधिनियमानुसार काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तिक्या लवकर, राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

मुंबई ग्रामपंचायत सुधारणा अध्यादेश, २००३ व मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) अध्यादेश २००३ हे याव्दारे निरसित करण्यात येत आहे असा या अधिनियमात उल्लेख केलेला आहे.

अशाप्रकारे निरसन झालेले असले तरीही, उक्त आदेशांव्दारे सुधारणा केल्याप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही या अधिनियमाव्दारे सुधरणा करण्यात आलेला मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या तरतुदीन्वये केलेली कृती किंवा यथास्थिती, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल असा शेवटी उल्लेख केलेला आहे.[१३]

अशा प्रकारे आपण सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ चा यथोचित अभ्यास करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केलेला आहे.

### ५.१४.३ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ दिनांक २१ डिसेंबर २००६ :

दिनांक २१ डिसेंबर २००६ रोजी मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम म्हणजे २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ होय.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अस्तित्वात आलेला अधिनियम म्हणजे सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ होय. या अधिनियमास, मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम २००६ असे म्हणावे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ याच्या कलम ३ मध्ये खंड (४) नंतर पुढील खंड नुसार समाविष्ट करण्यात येईल. (४ क) आयुक्त याचा अर्थ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,

१९६६ याच्या कलम ६ अन्वये नियुक्त करण्यात आलेला महसूल विभागाचा आयुक्त असा आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ८ मध्ये पंचायत प्रत्येक सहामाहीमध्ये एकदा, विकासविषयक कामावर केलेल्या खर्चाचा अहवाल ग्रामसभेपुढे ठेवील आणि त्याची माहिती पंचायतीच्या सूचना फलकावर लावील अशी तरतूद करण्यातआलेली आहे.

पोट कलम (२) मध्ये पोट कलम (१) खाली या मजकुराऐवजी पोट कलम (१) किंवा पोट कलम (१ क) खाली मजकूर दाखल करण्यात येईल.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १४ मधील, पोट कलम (१) मध्ये खंड (त्र-२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल (या कलमात पंचायतीच्या सदस्यांची पात्रता/ अपात्रता दिलेली आहे. यामध्ये खालीलप्रमाणे विशेष बदल झालेला आहे). (त्र-३) ज्या व्यक्तीने शासकीय जमिनीवर किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण केले आहे अशी व्यक्ती" किंवा

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९ मध्ये - (या कलमात सरपंच आणि उपसरपंच यांची कर्तव्ये व गैरवर्तुणुकीबाबत उल्लेख आहे) १-(क) जेव्हा एखाद्या व्यक्तीला सरपंचाच्या किंवा उपसरपंचाच्या अधिकारपदावरुन काढून टाकले असेल किंवा ती व्यक्ती पंचायतीच्या सदस्यांच्या उरलेल्या पदावरील सरपंच किंवा उपसरपंच म्हणून निवडून येण्यास पात्र असणार नाही.

वरील कलमात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

जो कोणताही सदस्य किंवा जो कोणताही सरपंच किंवा उपसरपंच आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या गैरवर्तुणुकीबद्दल किंवा कोणत्याही लांछनास्पद वर्तुणुकीबद्दल किंवा आपले कर्तव्य करण्याबाबत दुर्लक्ष केल्याबद्दल किंवा आपले कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ असल्याबद्दल दोषी असेल अथवा आपले कर्तव्य पार पाडण्यात दुराग्रहाने हेळसांड करीत असेल, तर अशा सदस्यास अथवा सरपंचास किंवा उपसरपंचास अधिकारपदावरुन काढून टाकता येईल. अशाप्रकारे काढून टाकण्यात आलेल्या सरपंचाला किंवा उपसरपंचाला आयुक्तांच्या स्वेच्छानिर्णयानुसार पंचायतीतूनही काढून टाकता येईल. किंवा (२) जर गावातील ज्यांनी इमारती व जमिनी यावरील कर व पाणीपट्टी यांच्या संबंधातील पंचायतीला देय असलेल्या सर्व रकमा चुकत्या केल्या असतील अशा एकूण मतदारापैकी किमान २०% एवढ्या मतदारांनी कलम ८ च्या पोट - कलम (१) किंवा (१ क) व्दारे आवश्यक असल्याप्रमाणे वार्षिक लेखे व पंचायतीने विकासविषयक कामावर केलेल्या खर्चाचा अहवाल ग्रामसभेसमोर ठेवण्यात आलेला नाही अशी तक्रार केली, तर पंचायतीच्या सदस्याला, सरपंचाला किंवा यथास्थिती, उपसरपंचाला अधिकारपदावरुन काढून टाकता येईल.

(१)

परंतु खंड एकच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा खंड (२) च्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने निर्देश दिल्याप्रमाणे उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने आयुक्ताच्या आदेशान्वये, संबंधित पंचायतीला व व्यक्तीला रीतसर नोटीस देऊन त्यानंतर चौकशी केलेली

असल्याखेरीज आणि संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिलेली असल्याखेरीज आणि त्यानंतर, संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा यथास्थिती उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत आपला अहवाल आयुक्तास सादर केलेला असल्याखेरीज, अशा कोणत्याही व्यक्तीस अधिकार पदावरुन काढून टाकता येणार नाही. चौकशी अधिकारी एका महिन्याच्या आत त्याचा अहवाल सादर करील.

परंतु आणखी असे, की आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा यथास्थिती, उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने, सादर केलेल्या अहवालावर तो मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर निर्णय घेईल.

(ख) पोटकलमे (२) आणि (३) ऐवजी, पुढील पोटकलमे दाखल करण्यात येतील.

"(२) आयुक्ताला, तशाच शर्तीला अधीन राहून जिने सदस्य, सरपंच किंवा उपसरपंच म्हणून आपल्या अधिकारपदाचा राजीनामा दिला असेल व जी पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृतीबद्दल व अकृतीबद्दल दोषी असेल अशा कोणत्याही व्यक्तीला पाच वर्षांहून अधिक नसेल एवढ्या कालावधीसाठी अपात्र ठरवता येईल. (३) पोट कलम (१) किंवा (२) खाली आयुक्ताने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीत राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि शासन, असे अपील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत त्यावर निर्णय घेईल."

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल असा उल्लेख सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ मध्ये करण्यात आलेला आहे. (या कलमात पंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच यांच्या गैरवर्तूणुकीबद्दल आहे त्यामध्ये पुढील बाबी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

"३९ क (१) कलम ३९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्य शासनास स्वाधिकार, अथवा कलम ३९ च्या पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कृतीच्या बाबतीत कोणताही सदस्य, सरपंच वा उपसरपंच यांच्याविरुध्द त्यांच्याकडे केलेल्या अर्जावरुन संबंधित मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास त्या सदस्याची, सरपंचाची किंवा यथास्थिती, उपसरपंचाची चौकशी करण्याचा आणि एक महिन्याच्या आत आपला अहवाल आयुक्ताला सादर करण्याचा निदेश देता येईल.

(२) आयुक्त त्या पंचायतीला आणि संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर एक महिन्याच्या आत त्या चौकशी अहवालावर निर्णय देईल.

(३) पोट कलम (२) अन्वये आयुक्ताने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस शासनाकडे तो आदेश त्याला मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत अपील करता येईल आणि शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल."

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५३ मध्ये सार्वजनिक सडका व खुली ठिकाणे यावरील अतिक्रमण, अडथळे याबाबत विश्लेषण केले आहे. या कलमानुसार पंचायतीच्या

निदर्शनास आल्यानंतर किंवा निदर्शनास आणून दिल्यानंतर पंचायतीने तत्काळ, वर नमुद केलेली कार्यपध्दती अनुसरुन असा अडथळा अथवा अतिक्रमण काढून टाकणे हे पंचायतीचे कर्तव्य असेल.

(ख) पोटकलम (२ क) मध्ये (एक) विहित करण्यात येईल अशा अवधीत हा मजकूर वगळण्यात येईल. (दोन) त्या पोट कलमात तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करता येईल. या मजकुराऐवजी 'त्या पोट कलमात तरतुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन त्या विषयीचा अहवाल आयुक्तांना सादर करता येईल' हा मजकुर दाखल करण्यात येईल.

(ग) पोटकलम (३ क) मध्ये स्थायी समितीकडे अपील या मजकुराने सुरु होणाऱ्या व असे आदेश देईल या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी 'आयुक्ताकडे अपील वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशा व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्याला आवश्यक वाटेल असे आदेश देईल हा मजकूर दाखल करण्यात येईल.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५७ मध्ये ग्रामनिधीबाबत माहिती देण्यात आली आहे. ग्रामनिधी, ग्राम पाणीपुरवठा निधी आणि पंचायतीची नावे, वेळोवेळी मिळणाऱ्या इतर रकमा यांच्या सुरक्षित अभिरक्षणासाठी, सचिव संपूर्णपणे जबाबदार असेल आणि त्या रकमांचा तो खालील प्रयोजनासाठी विनियोग करील. या मजकुराऐवजी ग्रामनिधी, ग्रामपाणीपुरवठा निधी आणि पंचायतीच्या नावे, वेळोवेळी मिळणाऱ्या इतर रकमा यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी सचिव आणि

सरपंच संयुक्तपणे जबाबदार असतील आणि त्यातील रकमांचा ते खालील प्रयोजनासाठी विनियोग करतील हा मजकूर दाखल करण्यात येईल.

त्याचबरोबर सचिव, त्यांच्या नियंत्रणाखालील निधीत जमा करण्यात आलेल्या आणि त्यातून देण्यात आलेल्या व शिल्लक रकमा त्यांचा तपशील देणारे एक साप्ताहिक लेखा विवरण सरपंचाला आणि मासिक लेखा विवरण गटविकास अधिकाऱ्याला सादर करावे लागेल. वरील कलम क्रमांक ४ मध्ये काही बदल करण्यात आला आहे. तो असा : (एक) सचिव त्याच्या नियंत्रणाखालील हा मजकुर वगळण्यात येईल. (दोन) "सरपंचाला" या मजकुराऐवजी पंचायतीला हा मजकूर दाखल करण्यात येईल. अशी तरतूद या अधिनियम क्रमांक ३८ मध्ये करण्यात आली आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ६० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल. (या कलमात पंचायतीच्या सचिवाच्या कार्याबाबत माहिती आहे)

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये कलम क्रमांक ८ पुढील प्रमाणे आहे. पंचायतीने लेखा विवरणे, इ. ग्रामसभेपुढे ठेवणे व ग्रामसभेची कर्तव्ये याचा समावेश केला आहे यात प्रत्येक वित्तीय वर्षातील ग्रामसभेची पहिली सभा त्या वर्षाच्या प्रारंभापासून दोन महिन्यांच्या आत घेण्यात येईल आणि पंचायत अशा सभेपुढे पुढील गोष्टी मांडील :

१. वार्षिक लेखा विवरणे.

२. मागील वित्तीय वर्षाचा प्रशासन अहवाल.

३. चालू वित्तीय वर्षात करावयाचा योजलेला विकास कार्यक्रम.

४. मागील लेखापरीक्षेची टिप्पणी व तिला दिलेली उत्तरे.

५. (स्थायी समिती, पंचायत समिती किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा स्थायी समितीने अथवा पंचायत समितीने याबाबत प्राधिकृत केलेला कोणताही अधिकार) अशा सभेपुढे मांडण्यास फर्मावतील अशी याबाबत कोणतीही बाब.

ग्रामसभेस तिच्यापुढे मांडलेल्या कोणत्याही किंवा सर्व बाबींवर चर्चा करता येईल आणि ग्रामसभेने कोणत्याही सूचना केल्या असतील तर त्याचा ग्रामपंचायत विचार करील.

राज्यशासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे फर्मावील अशी इतर कोणतीही कार्ये ग्रामसभा पार पाडील.

वरील कलमामध्ये पुढील विशेष तरतूद करण्यात आली आहे.

१. सचिवाकडे सोपविलेल्या इतर कोणत्याही कर्तव्याव्यतिरिक्त कलम ८ च्या पोट कलम (१ क) व्दारे आवश्यक असल्याप्रमाणे ग्रामसभेपुढे ठेवण्यासाठी, पंचायतीने विकासविषयक कामावर केलेल्या खर्चाचा अहवाल तयार करणे आणि त्याची माहिती पंचायतीच्या सूचना फलकावर लावणे हे सचिवाचे कर्तव्य असेल.

२. पोट कलम (१) व्दारे आवश्यक असल्याप्रमाणे, ग्रामसभेपुढे ठेवण्यासाठी पंचायतीने विकासविषयक कामावर केलेल्या खर्चाचा अहवाल तयार करण्यात आणि त्याची माहिती सूचना फलकावर लावण्यात सचिवाने कसूर केल्यास तो सचिव, महाराष्ट्र जिल्हा परिषद

जिल्हा सेवा (शिस्त आणि अपील) नियम, १९६४ च्या नियम ४ च्या खंड (पाच), (सहा) किंवा (सात) अन्वये त्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास पात्र असेल.

अशा प्रकारे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चा सुधारित अधिनियम जो २१ डिसेंबर २००६ रोजी प्रसिध्द केला गेला तो सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ चा बारकाईने अभ्यास करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. थोडक्यात स्पष्ट करावयाचे झाल्यास, या अधिनियमास मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम २००६ असे म्हणावे . या कायद्यात काही विशेष सुधारणा केल्या आहेत, त्या पुढील प्रमाणे.

१. विकासकामाचा आर्थिक अहवाल प्रत्येक सहा महिन्यांत ग्रामसभेपुढे ठेवणे.
२. शासकीय जमीन किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण करणारी व्यक्ती निवडणुकीस अपात्र राहील.
३. एकूण मतदारांपैकी वीस टक्के मतदारांनी आर्थिक हिशेब ग्रामसभेसमोर न ठेवल्यासंबंधी तक्रार केल्यास पंचायतीच्या सदस्याला/ सरपंचाला किंवा उपसरपंचाला काढून टाकण्याचा अधिकार ग्रामसभेला असेल.
४. तक्रारदारांना यापुढे पाणीपट्टी, घरपट्टी, इमारतीवरील कर भरावा लागेल.
५. आर्थिक गैरव्यवहारास ग्रामसेवक (सचिव) आणि सरपंच संयुक्तपणे जबाबदार असतील.
६. खर्चाचा अहवाल ग्रामसभेपुढे ठेवण्यास ग्रामसेवकाने (सचिवाने) कसूर केल्यास शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.

अशा प्रकारे तरतुदी मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम २००६ मध्ये करण्यात आल्या आहेत.[१४]

## ५.१५ शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसंबंधी आणि शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामात दप्तर दिरंगाईसंबंधी अण्णा हजारे यांचे विचार आणि केलेले कायदे

**प्रस्तावना :-**

ग्रामसभेला जादा अधिकार देऊन लोकशाही अधिक सुदृढ करण्याचा जसा अण्णा हजारे यांनी कायदा करुन प्रयत्न केला याप्रमाणे अण्णा हजारे यांना प्रशासनामध्ये, प्रशासकीय कर्मचाऱ्यांमध्ये काही दोष दिसून येत होते. म्हणून त्याविरुध्द अण्णा हजारे यांनी आवाज उठविण्याचा प्रयत्न केला. प्रशासनामधील ते दोष म्हणजे कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणे आणि कर्मचाऱ्यांच्या कामातील दप्तर दिरंगाई होय. अधिकाऱ्याची तीन वर्षात बदली करु नये. तीन वर्षानंतर एका जागेवर ठेवू नये. काही कारणास्तव बदली आवश्यक असेल तर मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांनाच अधिकार असावेत. आज बदल्या प्रकरणात बऱ्याच लोकांचे हिसंबंध असतात. काही वेळेला तर आर्थिक गैरव्यवहार होतात असे ऐकायला मिळते. काही वेळेला आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यास आपल्या सोयीच्या जागी घेतल्याने प्रामणिक काम करणाऱ्या माणसावर अन्याय होतो; कारण बऱ्याच लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यास त्याचा प्रामाणिकपणा आवडत

नाही. त्यासाठी बदल्याचा कायदा होणे आवश्यक आहे असे अण्णांचे मत होते. सरकारने त्यासाठी राज्यपालाच्या सहीने वटहुकूम काढला होता; पण तो रद्द झाला.

दप्तर दिरंगाईसंबंधाने अण्णा हजारे यांच्या मते, अधिकांश कार्यालयामध्ये काही अधिकारी कर्मचारी चिरी-मिरी दिल्याशिवाय नागरिकांची कामे करत नाहीत. ४/६ हेलपाटे मारणे गरीब माणसाला, ज्याचे हातावर पोट आहे, मजुरी केल्याशिवाय चूल पेटत नाही अशा माणसांना कसे शक्य आहे? त्यासाठी एका टेबलचा पेपर दुसऱ्या टेबलवर सात दिवसांत गेला पाहिजे, सात दिवसांच्या आत पेपर पुढे न गेल्यास टेबलवर असलेल्या संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही व्हावी, असा कायदा व्हावा, जेणेकरुन प्रत्येक नागरिकाला कार्यालयामध्ये जाण्याची वेळच येऊ नये. कार्यालयाच्या कामामध्ये जेवढा विलंब होतो तेवढा भ्रष्टाचार वाढतो. सात दिवसात पेपर पुढे चालत राहिला तर नागरिकांना कार्यालयामध्ये जाण्याची वेळच येणार नाही असे अण्णा हजारे यांच्या मत होते. म्हणून अण्णा हजारे यांनी शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध घालण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम व्हावा यासाठी सरकारशी अनेक वेळा पत्रव्यवहार केला, आंदोलने केली, सरकारशी संघर्ष केला आणि शासकीय कर्मचाऱ्याच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध घालण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम प्रसिध्द करण्यास सरकारला भाग पाडले. तो अधिनियम पुढील प्रमाणे.

**<u>सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ :</u>**

दिनांक १२ मे २००६ रोजी "महाराष्ट्र शासन राजपत्रात मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर प्रथम प्रसिध्द केलेला अधिनियम म्हणजे २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ होय. हा अधिनियम शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अस्तित्वात आलेला अधिनियम होय.

या अधिनियमास, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ असे म्हणावे. हा कायदा राज्यशासन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे नियत करील अशा दिनांकास अमलात येईल अशी या अधिनियमात तरतूद करण्यात आली आहे. हा अधिनियम अखिल भारतीय सेवेतील महाराष्ट्र संवर्गाच्या अधिकाऱ्यांसह, राज्य सेवेतील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असेल.

परंतु, एकाकी संवर्गातील बदलीयोग्य नसलेल्या पदांवर नियुक्त केलेले कर्मचारी आणि न्याय सेवेच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील कर्मचारी यांना प्रकरण दोन लागू होणार नाही आणि अखिल भारतीय सेवेतील महाराष्ट्र संवर्गाच्या अधिकाऱ्यांना प्रकरण तीन लागू होणार नाही.

**<u>या अधिनियमाच्या व्याख्या :</u>**

नागरिकांची सनद याचा अर्थ कार्यालयाने किंवा विभागाने दिलेल्या सुविधा किंवा सेवा यांची सूची, तसेच सुविधा किंवा सेवा सर्वसामान्य जनतेला पुरविण्यासाठी असलेली कालमर्यादा असा आहे.

सक्षम अधिकारी याचा अर्थ शासकीय कर्मचाऱ्याचा नियुक्ती प्राधिकारी असा आहे आणि त्यात कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बदली करणाऱ्या प्राधिकाऱ्याचा समावेश होतो.

विभाग किंवा प्रशासनीय विभाग याचा अर्थ महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, महाराष्ट्र शासनाचा विभाग असा आहे.

शासन किंवा राज्यशासन याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे.

गट अ, ब, क आणि ड पदे याचा अर्थ, शासनाच्या आदेशानुसार, वेळोवेळी, गट अ, ब, क, आणि ड म्हणून वर्गीकृत केलेली, शासनाच्या नियंत्रणाखालील पदे असा आहे.

शासकीय कर्मचारी याचा अर्थ महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम २ (ब) मध्ये व्याख्या केलेले शासकीय सेवक किंवा कर्मचारी असा आहे आणि यात अखिल भारतीय सेवेतील अधिकारी व न्यायसेवेच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील कर्मचारी (न्यायिक अधिकाऱ्यांव्यतिरिक्त) यांचा समावेश होतो.

पद याचा अर्थ शासकीय कर्मचाऱ्यास नेमून देण्यात आलेले किंवा त्याची पदस्थापना केलेले काम किंवा कर्तव्यपद असा आहे.

सेक्रेटरिएट सेवा याचा अर्थ, मंत्रालयीन विभागामधील राज्यसेवा असा आहे.

बदली याचा अर्थ शासकीय कर्मचाऱ्याची एका पदावरुन किंवा एका कार्यालयातून किंवा एका विभागातून दुसऱ्या पदावर, दुसऱ्या कार्यालयात किंवा दुसऱ्या विभागात होणारी पदस्थापना असा आहे.

बदली करणारे प्राधिकारी याचा अर्थ आधिनियमाच्या कलम ६ मध्ये नमूद केलेले प्राधिकारी, असा आहे.

इत्यादी बाबींचा समावेश या अधिनियमाच्या प्रकरण एक मध्ये करण्यात आला आहे.

**प्रकरण दोन :**

या अधिनियमाच्या प्रकरण दोनमध्ये पदस्थापनेचा पदावधी, बदली व बदली करणारे प्राधिकारी या घटकांचा समावेश होतो.

३) १. अखिल भारतीय सेवेतील आणि अ ब आणि क गटातील राज्य शासनाचे सर्व सेवक यांच्याकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षांचा असेल.

परंतु, असा कर्मचारी हा गट क मधील बिगर - सेक्रेटरिएट सेवेतील कर्मचारी असेल तर अशा कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदावर दोन पूर्ण पदावधींची सेवा पूर्ण केल्यानंतर त्यांची त्या कार्यालयातून किंवा विभागातून दुसऱ्या कार्यालयात किंवा विभागात बदली करण्यात येते.

परंतु आणखी असे, की असा कर्मचारी सेक्रेटरिएट सेवेत असेल तर अशा कर्मचाऱ्याला तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी त्याच पदावर ठेवण्यात येणार नाही आणि लागोपाठ दोन पदावधींपेक्षा अधिक पदावधींसाठी त्याला त्याच विभागात ठेवण्यात येणार नाही.

२. गट ड मधील कर्मचाऱ्यांसाठी सामान्यपणे पदावधी निश्चित केला जाणार नाही. ते ज्या ठिकाणी काम करीत असतील त्या ठिकाणाच्या बाहेर ज्या ठिकाणी त्यांनी बदली करण्याची विनंती केली असेल तेथे रिक्त पद असल्याखेरीज किंवा परस्परसंमतीने बदली मागितली असल्याखेरीज किंवा त्यांच्याविरुध्द गंभीर स्वरुपाची साधार तक्रार आली असल्याखेरीज त्यांची त्या ठिकाणाहून अन्यत्र बदली केली जाणार नाही.

४) १ सामान्यपणे कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याने कलम ३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याच्या नेमणुकीचा पदावधी पूर्ण केला असल्याखेरीज त्याची बदली करण्यात येणार नाही.

२. सक्षम प्राधिकारी, प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात त्या वर्षी एप्रिल व मे महिन्यात बदलीसाठी पात्र होतील अशा शासकीय कर्मचाऱ्यांची यादी तयार करील.

३. या अधिनियमाच कलम ६ खालील तक्त्यातील नोंदी (क) व (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गट अ अधिकाऱ्याकरिता वरील पोट कलम (२) अन्वये, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने तयार केलेल्या बदलीच्या यादीला मुख्य सचिवाशी किंवा यथास्थिती, विभागाच्या संबंधित सचिवाशी विचारविनिमय करुन मुख्यमंत्र्यांकडून किंवा यथास्थिती संबंधित मंत्र्यांकडून अंतिम मान्यता देण्यात येईल.

परंतु अशा बदलीच्या बाबतीतल्या कोणत्याही विवादावर मुख्य सचिवाशी विचारविनिमय करुन मुख्यमंत्र्यांकडून निर्णय घेण्यात येईल.

४. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या, सामान्यपणे वर्षातून केवळ एकदाच एप्रिल किंवा मे महिन्यात करण्यात येतील परंतु खाली नमुद केलेल्या परिस्थितीत वर्षातील कोणत्या वेळी.

१. नव्याने निर्माण केलेल्या पदावर किंवा सेवानिवृत्ती, पदोन्नती, राजीनामा, पदावनती, पुनःस्थापन यामुळे किंवा बदलीच्या परिणामस्वरुप रिक्त झालेल्या पदावर किंवा रजेवरुन परत आल्याच्या बाबतीत.

२. अपवादात्मक परिस्थितीमुळे किंवा विशेष कारणामुळे बदली करणे आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल अशा बाबतीत, तसे लेखी नमूद केल्यानंतर आणि लगत नंतरच वरिष्ठ प्राधिकाऱ्यांच्या पूर्वमान्यतेने अशी बदली करण्यात येईल.

३. कलम ३ मध्ये किंवा या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, विशेष प्रकरणात, सक्षम प्राधिकाऱ्याला कारणे लेखी नमूद करुन कलम ६ च्या तक्त्यामध्ये उल्लेखिलेल्या लगतपूर्व, बदली करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेऊन शासकीय कर्मचाऱ्याची, त्याचा पदावधी पूर्ण होण्यापूर्वी बदली करता येईल.

या अधिनियमाच्या कलम ५ मध्ये पदावधी वाढविण्यासंबंधी तरतुद करण्यात आली आहे.

१. शासकीय सेवक व कर्मचारी यांच्या नेमणुकीचा कलम ३ मध्ये निर्धारित केलेला पदावधी खाली विनिर्दिष्ट केलेल्या अपवादात्मक प्रकरणामधे वाढविता येईल. नेमणुकीच्या ठिकाणी किंवा पदावर पदावधी पूर्ण केल्यानंतर, बदलीसाठी पात्र झालेल्या कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीसाठी एक वर्षापेक्षा कमी कालावधी शिल्लक असेल तेव्हा कर्मचारी एखाद्या विशिष्ट कामासाठी आवश्यक ती तांत्रिक अर्हता किंवा अनुभव धारण करणारा असेल व त्या पदासाठी योग्य असा बदली कर्मचारी तत्काळ उपलब्ध नसेल तेव्हा आणि

२. कलम ३ मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी एकाच विभागातील किंवा कार्यालयातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात बदल्या केल्यामुळे शासकीय कामावर प्रतिकूल परिणाम होणार नाही याची सुनिश्चिती करण्यासाठी कोणत्याही कार्यालयातील किंवा विभागातील तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसतील इतक्या कर्मचाऱ्यांची एका वर्षात एकाच वेळी बदली करण्यात येणार नाही.

६. खाली दिलेल्या तक्त्याचा स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांची बदली त्या कर्मचाऱ्याच्या समोरच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बदली करणाऱ्या प्राधिकाऱ्याला करता येईल.

| शासकीय कर्मचाऱ्याचे गट | बदली करणारा सक्षम प्राधिकारी |
|---|---|
| (१) | (२) |
| क) अखिल भारतीय सेवेतील अधिकारी रुपये १०,६५०-१५८५० व त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणी राज्यसेवेतील गट 'अ' मधील सर्व अधिकारी | मुख्यमंत्री |
| ख) रुपये १०,६५०-१५,८५० पेक्षा कमी वेतन श्रेणी असलेले राज्य सेवेतील गट अ मधील सर्व अधिकारी आणि 'अ' मधील सर्व अधिकारी | संबंधित विभागाच्या सचिवांशी विचारविनिमय करुन त्या विभागाचा प्रभारी मंत्री |
| ग) गट 'क' मधील सर्व कर्मचारी | विभागप्रमुख |
| घ) गट 'ड' मधील सर्व कर्मचारी | प्रादेशिक विभागप्रमुख |

परंतु, तक्त्यातील नोंद 'ख' मधील अधिकाऱ्यांच्या बाबतीत, विभागीय किंवा जिल्हा स्तरावर काम करीत असलेला विभागप्रमुख अशा अधिकाऱ्यांची विभागांतर्गत बदली करण्यास सक्षम असेल आणि जिल्हाप्रमुख अशा अधिकाऱ्यांची जिल्हांतर्गत बदली करण्यास सक्षम असेल.

परंतु, आणखी असे, की तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या, बदली करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे, या कलमाखालील त्याचे अधिकार त्याच्या कोणत्याही दुय्यम प्राधिकाऱ्याकडे सोपविता येतील.

या अधिनियमातील कलम ७ सक्षम प्राधिकाऱ्यांची यादी प्रकाशित करणे या तत्त्वाशी संबंधीत आहे. कलम ७ अन्वये प्रयोजनाकरिता मंत्रालयाचा प्रत्येक प्रशासनिक विभाग आपल्या अधिकारितेतील विभागप्रमुखांची आणि विभागांच्या प्रादेशिक कार्यालय प्रमुखांची यादी तयार करुन

प्रकाशित करील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता आपल्या अधिकारितेतील बदल्या करण्यासाठी सक्षम असणारे प्राधिकारी अधिसूचित करील अशी तरतूद करण्यात आली आहे.

अशा प्रकारे आपण सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ च्या कलम १ ते कलम ७ चा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. कलम १ ते कलम ७ हा भाग शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी केलेल्या तरतुदींशी संबंधित आहे. यानंतर या अधिनियमाचा पुढील भाग म्हणजे सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ चे कलम ८ ते कलम १६ या भागाचा संशोधनात्मक अभ्यास आपल्याला करावयाचा आहे, जो मुख्यतः दप्तर दिरंगाई कायदा-२००६ म्हणून ओळखला जातो. या दप्तर दिरंगाई कायदा-२००६ च्या संशोधनात्मक अभ्यासाला सुरुवात करण्यापूर्वी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे हा कायदा प्रसिध्द होण्यापूर्वी काय विचार होते, ते आपण थोडक्यात पाहू.

## ५.१६ दप्तर दिरंगाईचा कायदा २००६ :

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ चे प्रकरण तीन :

**प्रस्तावना :**

अण्णा हजारे यांच्या मते, अधिकांश सरकारी कार्यालयांमध्ये काही अधिकारी - कर्मचारी चिरीमिरी दिल्याशिवाय नागरिकांची कामेच करत नाहीत. सतत कार्यालयात हेलपाटे मारणे सामान्य माणसाला ज्याचे हातावर पोट आहे, ज्यांचा मोलमजूरीवर उदरनिर्वाह होतो त्यांना शक्य नसते.

त्यासाठी एका टेबलवरील पेपर दुसऱ्या टेबलवर सात दिवसांत गेला पाहिजे, सात दिवसांच्या आत पेपर पुढे न गेल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई व्हावी असा कायदा होईल असे अण्णा हजारे यांचे मत होते. त्यांची नोंद घेऊन अशाप्रकारचा कायदा शासनाने पारित करावा यासाठी सरकारशी अनेकवेळा पत्र-व्यवहार, आंदोलने केली. शेवटी १२ मे २००६ रोजी सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाला.

या अधिनियमानुसार प्रत्येक कार्यालय किंवा विभाग या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, नागरिकांची सनद तयार करुन प्रसिध्द करील.

नागरिकांच्या सनदेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये, संबंधित प्राधिकाऱ्याकडून कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आला नाही तर, आवश्यक ती कार्यवाही न केल्याबद्दल त्यांना जबाबदार धरले जाईल आणि संबंधित अधिनियम, नियम किंवा विनिमय यामध्ये उल्लेखिलेली कारवाई त्यांच्यावर करण्यात येईल अशी तरतूद अधिनियमाच्या कलम ८ मध्ये करण्यात आली आहे.

त्याचबरोबर प्रत्येक कार्यालयाचा किंवा विभागाचा प्रमुख, त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या, त्याला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांकडे अंतिम निर्णय घेण्यासाठी सोपविण्यात आलेल्या अधिकारांची यादी प्रसिध्द करील. त्याचबरोबर प्रत्येक कार्यालयाचा किंवा विभागाचा प्रमुख त्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्या

सादर करण्यासाठी शक्यतो अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करील. तसेच दुय्यम अधिकाऱ्याकडे सोपविलेल्या अधिकारांची सूची तसे बाब सादर करण्यासाठी असलेले अधिकाऱ्यांचे स्तर, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत तयार करण्यात येतील व प्रसिध्द करण्यात येतील व पुढील प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिल रोजी ते अद्ययावत करण्यात येतील.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील कलम क्रमांक १० हे शिस्तभंगाच्या कारवाईशी निगडित आहे. त्यानुसार, प्रत्येक शासकीय कर्मचारी, त्यास नेमून दिलेले किंवा त्याच्याशी संबंधित असलेले शासकीय कर्तव्य व शासकीय काम अत्यंत दक्षतेने आणि शक्य तितक्या शीघ्रतने पार पाडण्यास बांधील असेल.

परंतु साधारणपणे, कोणतीही फाईल विभागातील किंवा कार्यालयातील कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याकडे सात कामाच्या दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही.

परंतु आणखी असे, की तत्काळ आणि तातडीच्या स्वरुपाच्या फाइली, त्या प्रकरणाच्या निकडीनुसार शक्य तितक्या शीघ्रतेने आणि प्राधान्याने, तत्काळ फाइल शक्यतो एका दिवसात किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी आणि तातडीच्या स्वरुपाची फाइल शक्यतो चार दिवसांत निकालात काढण्यात येईल.

परंतु तसेच दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता नसलेल्या फायलींच्या संबंधात, संबंधित विभाग त्या प्रकरणावर पंचेचाळीस दिवसांच्या आत निर्णय घेईल. आणि आवश्यक ती कार्यवाही करील आणि दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ

पाठवावयाची आवश्यकता असलेल्या फायलींच्या संबंधात तीन महिन्यांच्या आत निर्णय घेण्यात येईल आणि आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यास नेमून दिलेले किंवा त्याच्याशी संबंधित असलेले शासकीय कर्तव्य किंवा शासकीय काम पार पाडण्यास जाणूनबुजून किंवा हेतुपुरस्सर विलंब लावणे किंवा दुर्लक्ष करणे हे अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या कर्तव्यपालनातील कसूर ठरेल आणि असा शासकीय कर्मचारी, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये किंवा अशा कर्मचाऱ्याला लागू असलेल्या अन्य कोणत्याही संबध्द शिस्तविषयक नियमांखाली यथोचित शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र होईल.

त्याचबरोबर, कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याकडून झालेली कर्तव्यपालनातील अशी कोणतीही कसूर संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याच्या लक्षात आल्यावर किंवा लक्षात आणून दिल्यावर अशा शासकीय कर्मचाऱ्याकडून झालेल्या अशा कर्तव्यपालनातील कसुरीबाबत त्याची खात्री पटल्यावर तो कसूर करणाऱ्या अशा शासकीय कर्मचाऱ्याविरुध्द, अशा शासकीय कर्मचाऱ्याच्या वार्षिक गोपनीय अहवालांत नोंद करण्यासह संबध्द शिस्तविषयक नियमांखाली यथोचित शिस्तभंगाची कारवाई करील, अशी तरतूद या अधिनियमाच्या कलम १० मध्ये करण्यात आली आहे.

यानंतर या सन २००६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ च्या कलम ११ मध्ये विवक्षित परिस्थितीत कलम १० च्या तरतुदी लागू न होणे यासंबंधीच्या बाबींचा समावेश केलेला आहे. या कलम ११ नुसार, कलम १० मधील कोणतीही गोष्ट पुढील बाबींना लागू होणार नाही.

१. न्यायप्रविष्ट बाबी :

२. लोकआयुक्त किंवा उप लोकआयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग इत्यादी.

३. न्यायिकवत् बाबी

४. केंद्र किंवा अन्य राज्य शासनांच्या संबंधातील प्रकरणे

५. विधी-विधानाशी संबंधातील बाबी.

६. मंत्रिमंडळास सादर होणाऱ्या मुख्य धोरणात्मक बाबीसंबंधीची प्रकरणे.

त्याचबरोबर या अधिनियमातील कलम १२ प्रशासनिक मूल्यमापनाशी संबंधित आहे. या प्रकरणाच्या तरतुदींचे अनुसरण केले जात आहे किंवा कसे याची तपासणी करण्यासाठी शासन या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत विहित रीतीने प्रशासनिक मूल्यमापन करण्यासाठी एका यंत्रणेची तरतूद करील असे स्पष्ट केले आहे.

**<u>या अधिनियमाचे प्रकरण चार :</u>**

या अधिनियमामधील प्रकरण चारमधे कलम १३, कलम १४, कलम १५ व कलम १६ चा समावेश होतो. सुरुवातीला या अधिनियमातील कलम १३ सद्भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण

देण्याशी निगडित आहे. कलम १३ नुसार या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार, सद्‌भावनेने केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी कोणताही शासकीय कर्मचारी किंवा अधिकारी यांच्याविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही अशी तरतूद आहे.

सन २००६ चा अधिनियम क्रमांक २१ मधील कलम १४ नियम करण्याच्या अधिकाराशी संबंधित आहे. त्यानुसार,

१. राज्यशासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राजपत्रातील अधिसूचनेव्दारे आणि पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन राहून नियम करता येतील अशी तरतूद आहे.

२. या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशानात किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्यामध्ये अशाप्रकारे तो ठेवण्यात येईल ते अधिवेशन किंवा त्या अधिवेशनाच्या लगत नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, ते राजपत्रात अधिसूचित करतील तर, असा निर्णय राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अमलात येईल किंवा यथास्थिती, मुळीच अंमलात येणार

नाही तथापि असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही, अशा प्रकारची तरतूद या अधिनियमाच्या कलम १४ मध्ये करण्यात आली आहे.

या अधिनियमाचे कलम १५अडचणी दूर करण्याच्या अधिकाराशी संबंधित आहे. कलम १५ अन्वये,

१. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उदभवल्यास शासनास, प्रसंगानुरुप अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट राजपत्रात आदेश प्रसिध्द करुन करता येईल.

परंतु या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

२. या १५ व्या कलमाखाली काढलेला प्रत्येक आदेश तो काढण्यात आल्यानंतर तितक्या लवकर राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल अशी तरतूद आहे.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ मधील कलम १६ वे सन २००३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ याचे निरसन व आवृत्ती यांच्याशी संबंधित आहे. या १६ व्या कलमानुसार महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अध्यादेश २००३ हा याव्दारे निरसित करण्यात येत

आहे. तसेच, असे निरसन झाले असले तरीही युक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही या अधिनियमान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कार्यवाही किंवा यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.[१५]

## ५.१७ सारांश

अशाप्रकारे भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी ग्रामसभेला जादा अधिकाराचा कायदा आणि प्रशासनात स्थैर्य व पारदर्शकता, तत्परता निर्माण करण्यासाठी बदल्यांसंबंधीचा कायदा आणि दप्तरदिरंगाईचा कायदा अण्णा हजारे यांनी सरकारशी अथक पत्रव्यवहार, आंदोलने, उपोषणे करुन पारित करुन घेतला. त्यांनी पारित करुन घेतलेल्या या कायद्यामधून जनतेला आपल्या हक्क व अधिकाराची जाणीव निश्चित होईल व ग्रामसभेपासून विधानसभेपर्यंत उतरंडीप्रमाणे असणारी राजकीय व्यवस्था, आणि प्रशासन व्यवस्था जी वेगवेगळ्या वर्गांमध्ये विभागली आहे, ती मध्ये पारदर्शीपणा आणि भ्रष्टाचारमुक्तता हे गुण आल्याशिवाय राहणार नाही; मात्र गरज आहे ती या कायद्याचे पालन काटेकोरपणे करुन समाज घडविण्याची.

**संदर्भ सूची :-**


१) व्ही.सी.डी. : - माहितीचा अधिकार व ग्रामसभा अण्णा हजारे - एक चिन्तन निर्मिती भ्रष्ट्राचारविरोधी जन आंदोलन न्यास. साहित्य प्रकाशन विभाग, राळेगणसिध्दी ता. पारनेर जि. अहमदनगर.

२) हजारे अण्णा : - माहितीचा अधिकार २००५, नववी आवृत्ती जाने. २०१०, मुद्रक प्रकाशन : भ्रष्ट्राचारविरोधी जनआंदोलन न्यास, मु.पो. राळेगणसिध्दी, ता. पारनेर, जि. अहमदनगर. पृष्ठ क्रमांक ३९, ४०, ४१, ४२.

३) हजारे अण्णा : माहितीचा अधिकार २००५, मुद्रक, प्रकाशन : भ्रष्ट्राचारविरोधी जन आंदोलन न्यास, मु.पो. राळेगणसिध्दी ता. पारनेर जि. अहमदनगर. पृ. क्रं. ४३.

४) हजारे अण्णा : माझे गाव : माझे तीर्थ, मुद्रक व प्रकाशक : स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी प्रकाशन, मु.पो. राळेगणसिध्दी ता.पारनेर, जि.अहमदनगर, पृ. क्र. १९४, १९५, १९६, १९७, १९८, १९९, २००, २०१, २०२.

५) केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (सन २००५ चा अधिनियम क्रमांक २२), मुद्रक व प्रकाशक : नंदकुमार कारखानीस, पुणे विवेकानंद प्रकाशन पुणे, पृष्ठ क्रमांक : १.

६) शिंदे संतोष (२००५ ऑक्टोबर २२) माहितीचा अधिकार २००५, दै. पुण्यनगरी. भाटे शरद (२००५ ऑक्टो. २३), माहितीचा अधिकार २००५, दै. लोकसत्ता.

७) लोकराज्य, मे २००६ - माहिती जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, दै. लोकसत्ता, ११ ऑगस्ट, २००६, मंथन पुरवणी, ॲड. अभया शेलकर - माहितीचा अधिकार, नाशिक लॉ हाऊस, औरंगाबाद.

८) चौहान श्यामसुंदर (२००५, ऑक्टोबर) सूचना पाने का अधिकार : जवाबदेही युक्त विकास की कुंजी, प्रतियोगिता दर्पण. ऑक्टोबर २००५, पृष्ठ क्रमांक : ५०४. करंबे, संतोष (२००५ डिसेंबर १२) माहितीचा अधिकार कायद्याचा धडा शिका आणि शिकवा, चित्रेलखा, पृ. क्र. १७.

९) हजारे अण्णा - माहितीचा अधिकार २००५, मुद्रक, प्रकाशन - भ्रष्टाचारविरोधी जन आंदोलन न्यास, मु.पो. राळेगणसिध्दी पृ. क्र. ६२ ते ७८.

१०) हजारे अण्णा : ग्रामसभा, सुधारित आवृत्ती २०१०, मुद्रक व प्रकाशक : भ्रष्टाचारविरोधी जन - आंदोलन न्यास - साहित्य प्रकाशन, मु.पो. राळेगणसिध्दी पृ. क्र. ५, ६.

११) हजारे अण्णा : सज्ज व्हा... उठा... चला, मुद्रक व प्रकाशक : प्रा. ए. टी. भोसले सचिव, भ्रष्टाचारविरोधी - जन आंदोलन न्यास (महाराष्ट्र), अमोल पॅलेस, रस्ता क्रं. ३, वडगाव शेरी, पुणे - १४, पृष्ठ क्रमांक २, ३.

१२) हजारे अण्णा : ग्रामसभा, सुधारित तिसरी आवृत्ती, एप्रिल २०१०. मुद्रक व प्रकाशकः भ्रष्टाचारविरोधी जन आंदोलन न्यास, साहित्य प्रकाशन, मु.पो. राळेगणसिध्दी ता. पारनेर जि. अहमदनगर, पृष्ठ क्रमांक : ७, ८, ९, १०.

१३)	हजारे अण्णा : ग्रामसभा, सुधारित तिसरी आवृत्ती, एप्रिल २०१०, मुद्रक व प्रकाशक : भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास - साहित्य प्रकाशन, मु.पो. राळेगणसिध्दी, ता. पारनेर, जि. अहमदनगर, पृष्ठ क्रमांक ११ ते १९.

१४)	कित्ता : पृष्ठ क्रमांक २० ते २५.

१५)	कित्ता : पृष्ठ क्रमांक ३२ ते ३९.